


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ | अंक : ४२ | सोमवार दि. २७ ऑक्टोबर २०२५ ते रविवार दि. २ नोव्हेंबर २०२५ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड

॥ जय माता जी ॥



॥ माता बारोंडादेवी प्रसन्न ॥

# पत्नीवरच्या रागामुळे बाप बनला साप
# दोन चिमुकलींचे गळे चिरून केले पाप

बुलढाणा : क्राईम रिपोर्टर

**संसारात भांड्याला भांड लागत पण काही लोक समजदार असल्याने दोन भांड्यांचा आवाज शेजाऱ्यांनाही ऐकायला जात नाही. घरातले वाद घरातच मिटवले जातात. पण काही लोक मात्र कौटुंबिक भांडणातून इतके प्रक्षुब्ध होतात कि त्यांच्यात राक्षस संचारतो आणि मग ते कोणाचाही विचार करीत नाही. अगदी रक्ताच्या नात्याची सुद्धा त्यांना ओळख राहत नाही. वास्तविक जो कुटुंबप्रमुख असतो त्याला संयमाने वागायचे असते. कारण त्याला संसाराचा गाढं हाकायचा असतो. त्यामुळे घरात पती पत्नी किंवा आई वडिलांसोबत जरी वाद झाला तरी तो वाद जास्त वाढणार नाही याची काळजी घ्यायची असते. कारण संसारात पती पत्नीवर त्यांच्या मुलांचीही जबाबदारी असते. त्यामुळे आपल्या वादाचा मुलांवर नाही याचीही दक्षता बाळगायची असते. पण काही लोक इतके शीघ्रकोपी असतात की एखाद्या गोष्टीचा त्यांना राग आला कि रागाच्या भरात ते कुठल्याही थराला जातात. त्यांचे स्वतःवर नियंत्रण राहत नाही. त्यामुळे त्यांच्या हातून काहीही घडू शकते. कधी कधी अशी माणसे चिडली कि एकचा राग दुसऱ्यावर काढतात. बरे रागाच्या भरात आपण काय करीत आहोत याचेही त्यांना भान नसते. अशी माणसे त्यांच्या कुटुंबासाठी तर घातक असतातच पण समाजासाठी सुद्धा धोकादायक असतात. काही लोकांना राग आला कि आपला राग ते बायकोवर किंवा मुलांवर काढतात. वाशीम जिल्ह्याच्या रुई गावात अशीच एक भयंकर घटना उघडकीस आलेली आहे. रुई गावात राहणार व पुण्यात एका खाजगी कंपनीत सुरक्षा रक्षक असलेल्या राहुल चव्हाण याचे पत्नीबरोबर भांडण झाले होते. त्यामुळे चिडलेल्या पत्नीने माहेरी जाण्याचा निर्णय घेतला. मात्र पत्नीच्या याच निर्णयामुळे राहुल इतका चिडला कि त्याने पत्नीवरचा राग जुळ्या चिमुकल्या मुलींवर काढला. त्याने मुलींना जंगलात नेवून त्यांची निर्दयपणे गळा चिरून हत्या केली. या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला असून आरोपी बापाला फासावर लटकवा अशी मागणी केली जात आहे. सध्या आरोपी पोलिसांच्या ताब्यात असून त्याची चौकशी सुरु आहे.**



नवरा-बायकोचे नाते नाजुक धाग्याने बनलेले असते. या नात्याला वादाच ग्रहण लागलं तर तर सुखी संसाराची राखरांगोळी होते. बुलढाण्यातही अशीच एक धक्कादायक घटना घडली आहे. पत्नीशी झालेल्या वादाचा नराधम बापानं जुळ्या मुलींवर काढला. पत्नीवर आलेल्या रागातून त्याने दोन मुलींचा जीव घेत त्यांच्या मृतदेह जंगलात पुरला. संतपाजनक घटना बुलढाणामधील अंढेरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडली आहे. मानवतेलाही काळिमा फासणारी घटना जिल्ह्यातील अंढेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघड झाली आहे. राहुल चव्हाण असे आरोपी वडिलांचे नाव आहे. राहुल चव्हाण हा रुई (जि.वाशिम) येथील रहिवासी आहे. तो पुण्यातील एका खाजगी कंपनीत नोकरी करत होता. राहुल चव्हाणने आपल्या दोन जुळ्या अडीच वर्षीय चिमुकल्या मुलींचा गळा चिरून निर्दयपणे खून केला. राहुल आपल्या पत्नी आणि दोन मुलींसह घरी जात होता. त्यावेळी राहुलचा बायकोशी वाद झाला. संतापाच्या ...पान २ वर

# 'ब्रेकअप'नंतर प्रियकराची घालमेल झाली
# प्रेयसीचा खून करून स्वत: आत्महत्या केली






मुंबई : क्राईम रिपोर्टर

**आजकाल प्रेमाच्या नावाखाली एकत्र यायचे आणि काही दिवस एकत्र राहून नंतर बाजूला व्हायचे हे आता नवीन नाही. पण अशा तकलादू प्रेमातून काही अप्रिय घटनाही घडतात. काळाचौकीत अशाच एका घटनेत ब्रेकअप झालेल्या एका प्रेमी युगलाला जीव गमवावा लागला. ब्रेकअपच्या अनेक कारणे असू शकतात. काही लोक ती सिरीयसली घेतात. तर काही दुर्लक्ष करतात. मात्र आपल्या प्रेमात जो सिरीयस असतो, त्याला सहसा ब्रेकअप मंजूर नसतो. मात्र अशावेळी प्रेयसीने हटवादी भूमिका घेतली, एकत्र राहायचेच नाही असे ठरवले, तर प्रियकर दुखावतो किंवा प्रेयसींबाबत त्याला आणखी काही वेगळी माहिती मिळाली तरी तो अस्वस्थ होतो आणि त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते. मुंबईच्या काळाचौकी भागात प्रेमातील ब्रेकअपनंतर सुडाने पेटलेल्या अशाच एका प्रियकराने भर रस्त्यात प्रयसीची हत्या करून स्वतःही आत्महत्या केली. या घटनेमुळे काळाचौकीत खळबळ माजली असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.**

गजबजलेल्या आणि दाट लोकवस्तीच्या काळाचौकी परिसरात शुक्रवारी सकाळी घडलेल्या एका थरारक घटनेने मुंबई हादरली आहे. प्रेमसंबंधातून उद्भवलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर एका तरुणाने आपल्या प्रेयसीवर भररस्त्यात चाकूने वार केले आणि नंतर स्वतःचाही गळा चिरून आत्महत्या केली. या घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. काळाचौकीतील आंबेवाडी भागात राहणारा सोनू बराय (वय २४) आणि त्याच परिसरातील मनीषा यादव हे दोघे काही महिन्यांपासून प्रेमसंबंधात होते. मात्र, गेल्या दहा दिवसांपूर्वी ...पान २ वर

# पाठलाग करणारा तरुण इरेला पेटला
# शरीरसुखाला नकार देताच जीव घेतला



पुणे (उरुळी कांचन) : क्राईम रिपोर्टर

**श्रीदेहाचे आकर्षण असलेले आणि वासनेने बरबटलेले पुरुष समाजात ठिकठिकाणी वावरताना दिसतात. अशाच वासनांध पुरुषांमुळे महाराष्ट्रातील महिलांची सुरक्षा धोक्यात आली आहे. एखादी सुंदर स्त्री नजरेत भरली कि तिचा पाठलाग करायचा. तिचा मोबाईल नंबर मिळवायचा त्यावरून अश्लील मॅसेज पाठवायचे. असे प्रकार आजकाल घडू लागलेत. पुण्या नजीकच्या उरुळी कांचन येथे अशाच एका घटनेत एक दिनेश पाटोळे नावाचा तरुण पूनम ठाकूर या तरुणीकडे आकर्षित झाला होता. त्यातून तो तिचा पाठलाग करायचा. एकदा त्याने पूनमला रस्त्यात अडवून शरीरसुखाची मागणी केली. मात्र तिने नकार देताच त्याने तिची हत्या केली. या प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

उरुळी कांचन हद्दीत दि.१४ ऑक्टोबर रोजी आढळलेल्या युवतीच्या खून प्रकरणाचा उलगडा स्थानिक गुन्हे शाखा आणि उरुळी कांचन पोलिस स्टेशनच्या संयुक्त पथकाने केल्याची ...पान २ वर

# दोघींचा खून करून 'सिरीयल किलर' ठरला
# पोलिसांच्या हाती लागताच पापाचा घडा भरला







जळगाव : ललित खरे

**महिलांना आपल्या नादी लावून त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढायचे आणि नंतर त्यांचे दागिने लुटून तिची हत्या करायची अशी काही सिरीयल किलर गुन्हेगारांची मोडस ऑपरेंडी असते. जळगाव जिल्ह्याच्या पारोळा तालुक्यातील सुमठाणे येथे राहणार अनिल संदाशिव हा सुद्धा असाच सिरीयल किलर होता. आतापर्यंत याच पद्धतीने दोन महिलांची त्याने हत्या केली होती. पण सुदैवाने एक त्याच्या हल्ल्यातून वाचली. या वाचलेल्या मी, महिलेने पोलीस ठाण्यात घडलेल्या घटनेची फिर्याद नोंदवली, त्यानांतर पोलिसांची तपासाची चक्रे वेगाने फिरली आणि अनिल पोलिसांच्या जाळ्यात अडकला.**









पारोळा तालुक्यातील सुमठाणे या लहानशा गावात अनिल गोविंदा संदानशिव हा तरुण रहात होता. त्याचे वडील गोविंदा खेमा संदानशिव हे वन विभागात नोकरीला होते. तो रहात असलेल्या अमळनेर आणि पारोळा परिसरातील जंगल परिसराची त्याला चांगल्याप्रकारे माहिती होती. सुमारे सात वर्षापुर्वी त्याचे वडील वारले होते. अविवाहीत अनिल याच्यासह घरात त्याचा लहान भाऊ आणि विधवा आई ...पान ६ वर

# संशयामुळे कंटाळली होती मानसिक छळा
# चिडलेल्या पत्नीने आवळला पतीचा गळा

पिंपरी-चिंचवड : क्राईम रिपोर्टर



**संशय हा खूप वाईट असतो. कारण तो बळावला कि माणसाच्या मनात सुडाची भावना निर्माण होते. आजकाल सुखी संसारातही संशयामुळे वादंग निर्माण होते. पुढे पती पत्नीमधील वाद विकोपास जातात आणि पती पत्नीच्या नात्यात दुरावा येतो. प्रेमाचे रूपांतर सूडाच्या होते आणि त्यातूनच एखाद्याचा जीव जाण्याचीही शक्यता असते. पुण्याच्या पिंप्री चिंचवड मधील अशाच एका घटनेत पती पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याने चिडलेल्या पत्नीने पतीची गळा आवळून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नीला अटक केली आहे.**

चारित्र्यावर संशय घेणाऱ्या पतीची पत्नीने गळा आवळून हत्या केली आहे. ही घटना चिंचवडमध्ये आज पहाटे पावणे तीनच्या सुमारास घडली आहे. घटनेनंतर आरोपी पत्नीला चिंचवड पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. ४० वर्षीय नकुल भोईर असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव असून २८ वर्षीय चैताली नकुल भोईर हिला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. नकुल भोईर हा पत्नी चैतालीच्या चारित्र्यावर सतत संशय घेत होता, यावरून त्यांच्यात अनेकदा वाद झाले. परंतु, शुक्रवारी पहाटे झालेल्या वादातून मुलांचं भवितव्य ...पान ६ वर

# चारित्र्याच्या संशयाने झाला होता बेजार
# पोलिसाने केले कंडक्टर पत्नीलाच ठार

सौंदती (कर्नाटक) : क्राईम रिपोर्टर





**पत्नी नोकरदार असली की काही पुरुषांच्या डोक्यात नेहमी संशयाचा कीड वळवळतो. कर्नाटकातील रामपूरमध्ये राहणाऱ्या कौशव्वा आणि संतोष याचा प्रेमविवाह झाला होता. ती एसटीमध्ये कंडक्टर होती, तर संतोष पोलीस होता. एक मुलगा होऊनही त्यांचे पटत नव्हते. कारण तो तिच्या चारित्र्यावर संशय घेत असे. त्यातून दोघांची भांडणे व्हायची. अखेर घटस्फोट झाला. त्यानंतरही मुलाचा ताबा घेण्यासाठी तो तिला सतावू लागला. त्यातून पुन्हा त्यांच्यात भांडणे होऊ लागली आणि याच भांडणात एके दिवशी संतोष याने काशव्वाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी संतोषला अटक केली आहे.**

सौंदती तालुक्यातील रामपुर साईट येथील काशव्वा करीकट्टी हिने बारा वर्षापूर्वी संतोष कांबळे याच्याशी प्रेमविवाह केला. ती कर्नाटक राज्या परिवहन मंडळात एस.टी. कंडक्टर म्हणून नोकरी करू लागली. तर संतोष कांबळे हा निपाणी ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत आहे. दोघांचा प्रेम विवाह असल्याने संसार बहरत फुलत होता.प्रेम विवाहानंतर त्यांना एक मुलगा ही झाला. तो मुलगा सध्या ११ वर्षाचा आहे. काशव्वा ही बस कंडक्टर म्हणून निपाणी बस डेपामध्ये नोकरी करीत असल्याने ती घरी कमीच असायची. तर संतोष ही निपाणी पोलीस स्टेशनमध्ये पोलीस कॉन्स्टेबल म्हणून नोकरी करीत असल्याने निपाणीत ते दोघे ही भाडयाने खोली करून राहत होते. काशव्वा ही दिसायला सुंदर देखणी असल्याने ती बस कंडक्टर म्हणून नोकरी करीत असल्याने संतोषच्या मनात तिच्या चारित्र्याचा संशय निर्माण झालेला होता. दोघाची या कारणातून नेहमी भांडणे होत होती. तिचे तिच्या सहकारी कर्मचाऱ्याशी संबंध असावेत असा संशय संतोषच्या मनात होता. कारण ती त्याच्याशी आपल्या मोबाइलवरून तास न ...पान २ वर

# पैशांच्या वादातून निर्घृण हत्याकांड घडले
# व्याहीचा खून करून वाघावर बिल फाडले

नाशिक : क्राईम रिपोर्टर



**काही लोक इतके शातीर दिमाग असतात कि हत्ये सारखा गंभीर गुन्हा करून आपले पाप लपवण्यासाठी मुक्या प्राण्यांकडे बोट दाखवतात. पण साध्य कधीच लपत नाही. अशा गुन्ह्यांचा पोलिसांकडून पर्दाफाश होतो आणि शेवटी आरोपी पोलिसांच्या जाळ्यात सापडतो. नाशिक जिल्ह्याच्या हतंरूडी गावात अशाच एका घटनेत शिवराम गवळी या इसमाने त्याचे व्याही देवराम गावीत यांचा पैशांच्या वादातून खून केला आणि देवराम याना वाघाने मारले असा बनाव केला. पण पोलिसांनी आणि गावकऱ्यांनी बनाव हाणून पाडला. अखेर पोलिसांच्या चौकशीत शिवरामने आपणच आपले व्याही देवराम यांचा खून केल्याचे कबुल केले. त्यामुळे त्यांना अटक करण्यात आली.**

नाशिक जिल्ह्याच्या सुरगाणा तालुक्यातील हतंरूडी गावाच्या शिवारातील शेत गट नं. २६ टेंबुर्णीची माळीमध्ये शेतातच झाप बांधून देवराम नाना गावित हे एकटेच रहात होते. त्यांना हिरामण नावाचा ४० वर्षाचा मुलगा असून तो सर्वात धाकटा आहे. हिरामण आपली पत्नी भारती, मुलगी योगिता आणि मुलगा कुणाल असे सर्व जण मजुरी कामासाठी शेपूपाडा, ता. कळवण या गावी गेले आहेत, तर देवराम गावित यांचा मोठा मुलगा रामदास हा त्याचे ...पान २ वर

# मोबाईलवरचा वाद जीवघेणा ठरला
# गुंड जावेदने जयंतचा गळा चिरला

विटा (खानापुर) : क्राईम रिपोर्टर





**गुंड प्रवृत्तीच्या लोकांशी कुणीही मैत्री करू नये आणि मैत्री केलीच तर त्याच्याशी कोणतेही व्यवहार किंवा अन्य वस्तूंची देवाण घेवाण करू नये. कारण अशा लोकांना घ्यायची सवय असते, पण घेतलेले परत करायची दानात नसते. पण नेमकी हाच गोष्ट खानापूर मधल्या जयंत भगत याला कळली नाही. त्याने गुन्हेगारी प्रवृत्तीच्या जावेद याच्याशी मैत्री केली आणि एकदा आपला मोबाईल त्याला वापरायला दिला. मात्र जावेद जयंत याचा मोबाईल परत करीत नव्हता. त्यामुळे जावेद घरी नसताना जयंत त्याच्या घरी गेला आणि आपला मोबाईल घेऊन आला. या गोष्टीचा जावेदला भयंकर राग आला आणि रागाच्या भरात त्याने मित्र असलेल्या जयंतची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी जावेदला अटक केली आहे.**

खानापुर शहरात जयंत विश्वास भगत हा तरूण आपल्या कुटूंबासह राहयला आहे. तो एका खाजगी ट्रॅव्हलवर किल्नर म्हणून काम करीत असल्याने तो सारखा फिरतीवर असतो. त्याची जावेद मुबारक अतार बरोबर मैत्री होती. दोघे ही जवळचे चांगले मित्र असल्याने दोघात उठबस ही होत होती. दोघे ही दारू प्यायला जेवायला एकत्र येत होते.जावेद हा सराईत गुंड प्रवृतीचा असल्याने त्याला कशाची भिती वाटत नव्हती. मागील महिन्यातच त्याने आपल्या मेहुण्यावर जीवघेणा हल्ला केल्याने त्याच्यावर पोलीस केस होऊन तो जेलमध्ये गेला होता. अलिकडेच तो त्या केसमधून जामीनावर बाहेर आला असल्याने तो तसा बिनधास्त फिरत होता. तो राहत असलेल्या परिसरात त्याची दशहत होती. तो कोणाला ही कुठल्या ही कारणातून दादागिरी करीत त्याच्याकडून पैसे उकळत होता. त्यामुळे त्याच्या परिसरातील लोक त्याचेवर चिडून होते. जयंत बरोबर त्याची मैत्री असल्याने चांगला जयंत त्याच्या नादाला कशाला लागला आहे असे लोक म्हणत होते. या कारणातू ...पान २ वर

27 OCTOBER TO 02 NOVEMER 2025 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 10/25/2025 7:36 PM Page 1



पान १ वरून...

## बायकोवरच्या रागामुळे बाप बनला ...

भरात पत्नी माहेरी जाण्यास निघाली. तर रागाच्या भरात राहुलने आपल्या दोन निरपराध मुलींना घेऊन अंढेरा फाटा परिसरातील अंचरवाडी शिवारातील जंगल गाठले. तिथे त्याने दोन्ही जुळ्या मुलींचा गळा चिरून त्यांचा जीव घेतला. यानंतर, या नराधमाने स्वतः वाशिम पोलीस ठाण्यात जाऊन थेट गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली व पंचनामा केला. डीवायएसपी मनिषा कदम पोलीस निरीक्षक शंकर शक्करगे, अधिकारी संतोष खराडे, जाधव, जारवार, फुसे आदी घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. या अमानुष घटनेने संपूर्ण बुलढाणा जिल्हा हादरला आहे.एका वादातून दोन कोवळ्या जीवांचा अंत झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पित्याच्या हातून चिमुकल्या मुलींचा खून झाल्याची ही घटना समाजाला हादरवून टाकणारी असून, अशा विकृत मानसिकतेविरोधात कठोरात कठोर कारवाईची मागणी होत आहे.

## ‘ब्रेकअप’नंतर प्रियकराची घालमेल...

काही कारणाने त्यांच्यात वाद होऊन ब्रेकअप झाले होते. शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास दत्ताराम लाड मार्गावरील मयुरेश इमारतीसमोर दोघांची भेट झाली. बोलण्यातून वाद सुरु झाला आणि रागाच्या भरात सोनूने खिशातून चाकू काढला. त्याने मनीषावर वार करण्यास सुरुवात केली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे मनीषा आरडाओरड करत पळाली आणि जीव वाचवण्यासाठी जवळच असलेल्या आस्था नर्सिंग होममध्ये धाव घेतली. परंतु संतापलेल्या सोनूने तिचा पाठलाग करत नर्सिंग होममध्ये प्रवेश केला आणि तिथेही तिच्यावर जीवघेणे वार केले. आजूबाजूचे नागरिक आणि नर्सिंग होममधील कर्मचारी मदतीसाठी धावले असता, सोनूने त्याच चाकूने स्वतःचाच गळा चिरून घेतला. काही क्षणांतच दोघेही रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. घटनेची माहिती मिळताच काळाचौकी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्याच वेळी, जवळच वाहतूक नियंत्रणाचे काम बजावत असलेले कॉन्स्टेबल किरण सूर्यवंशी यांना काही नागरिकांनी माहिती दिली. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता नर्सिंग होममध्ये धाव घेतली, सोनूच्या तावडीतून मनीषाची सुटका केली आणि तिला टॅक्सीद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे रुग्णालयात दाखल केले. तेथे तिला तातडीने प्रथमोपचार देण्यात आले, मात्र तिची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी तिला जे. जे. रुग्णालयात हलवण्यात आले. दरम्यान, सोनूला केईएम रुग्णालयात नेण्यात आले, परंतु डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. रुग्णालयात काही तास चाललेल्या उपचारांनंतर मनीषानेही अखेर सायंकाळी प्राण सोडले. तिच्या शरीरावर चाकूचे अनेक वार झाल्यामुळे अतिरक्तस्त्राव होऊन तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## चारित्र्याच्या संशयाने झाला होता ...

तास बोलत असायची. दोघांची ही डयुटी एकत्र असायची. त्यामुळे काशव्वाचा त्याच्याशी संपर्क जास्त असायचा. तिचा प्रियकर हा संतोष हा घरी नसताना ही तिला भेटायला घरी येत जात असल्याने त्याच्या मनात वेगळीच पाल चुकचुकत होती. पत्नी काशव्वाचे त्याच्याबरोबर शारीरिक संबंध ही असावेत असा प्रश्न ही त्याच्या मनात येत होता. या कारणातून नवरा बायकोची भांडणे विकोपला गेली होती. भांडणात ती संतोषला सांगत होती की, आपण दोघांनी प्रेम विवाह केला आहे.तुझ्या शिवाय माझे दुसऱ्या कुठल्या परपुरूषाबरोबर संबंध असतील का? उगाच डोक्यात कशाला राख घालून घेतोस. परंतु त्याच्या मनात एकदा तिच्या विषयी संशय निर्माण झाल्याने तो संशय काही केल्या जात नव्हता. त्यातच त्याला तिच्या मोबाईलवर तिच्या प्रियकराबरोबरचे फोटो ही पाहयला मिळाले होते. त्यामुळे त्याचा संशय खरा ठरला होता. हल्ली संतोष हा दारू पिऊन येवून तिला या कारणातून मारहाण करीत शिवीगाळ करीत होता.त्याचा त्रास तिला जास्त होत होता. नवरा बायकोची भांडणे दोघांच्या ही नातेवाईकांनी ही मिटविण्यचा प्रयत्न केला होता. दोघांना ही त्यांना समजावून सांगितले होते. परंतु दोघे ही हट्टखोर आणि भांडखोर असल्याने भांडणात कुणी ही माघार घेत नव्हते. दोघे ही सरकारी नोकरीत असल्याने दोघांना ही तशी एकमेकांची गरज नाही असे ते दोघे दाखवित होते. त्यातच तो तिच्यावर जास्तच संशय घेऊन मारहाण करीत असल्याने काशव्वाने त्याच्यापासून वेगळे राहण्याचा विचार केला. तिने निपाणी बस डेपातून बदली करून सौंदती बस डेपात घेतली होती. त्यामुळे ती आपल्या मुळ गावी रामपुर येथे आपल्या मुलाला घेऊन राहयला आली. तिने त्याच्या विरोधात कोर्टात घटस्फोटाचा दावा ही दाखल केला. सौंदती कोर्टात तिने घटस्फोटाचा दावा दाखल केल्याने तिला यायला जायला सोईस्कर होते. तो ही कोर्टाच्या तारखेला येत होता. तारखेला आल्यावर तो तिच्याकडे आपल्या मुलाचा ताबा मागत होता. हल्ली या कारणातून दोघांची भांडणे होऊ लागली होती. मुलाचा ताबा तो आपल्याकडे मागत असल्याने पंचासमोर ही हा वाद मिटविण्याचा प्रयत्न झाला. पंचानी मुलाला विश्वासात घेऊन विचारले असता त्याने आपण आपल्या आईकडे राहणार असल्याचे पंचाना सांगितले होते. त्यामुळे मुलाच्या निर्णयाने पंचानी ही मुलाचा ताबा संतोष कांबळेकडे दिला नाही. मुलगा ही तिच्याकडेच राहत असल्याने संतोष हा तिच्यावर जास्तच चिडला होता. तो तिच्याकडे जबरदस्तीने मुलाचा ताबा मागत होता. मुलाला जबरदस्तीने तो आपल्याकडे ठेवून घेण्याचा प्रयत्न करीत होता. त्यामुळे तिने त्याच्या विरोधात केस असून ही पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली होती. नवरा बायकोच्या भांडणाने वेगळेच वळण घेतले होते. संतोष कांबळे हा रामपुर येथे जावून तिच्याबरोबर भांडण करून तिला मारहाण करीत होता. ती जरी डयुटी वर गेलेली असली तरी तो तिच्या कामाच्या ठिकाणी जावून तिला त्रास करीत होता. त्यातच गेल्या एप्रिल महिन्यात घटस्फोटाचा निकाल ही तिच्या बाजूने लागलेला होता. त्या निकालाने ही मुलाचा ताबा हा तिच्याकडेच राहणार असल्याने तो जास्तच तिच्यावर चिडला होता. रामपुर येथे जावून तो तिला या कारणातून मारहाण करीत होता. घटस्फोटाचा निकाला तिच्या बाजूने लागला असल्याने ती त्याला आपल्या घरी येण्यास मज्जाव करीत होती. तरी ही तो तिच्याकडे जबरदस्तीने तिच्याकडे मुलाचा ताबा मागण्यासाठी येत होता. शुक्रवार दि.१७ ऑक्टोंबर रोजी संतोष कांबळे हा निपाणीतून सौंदती रामपुर येथे आला होता. रात्री तो तिच्या घरीच थांबला होता. रात्री दारू आणि जेवण करून त्याने तिच्याबरोबर शरीर संबंध ही ठेवले. काम झाल्यावर त्याने तिच्याकडे मुलाचा ताबा मागितला.या कारणातून दोघात वाद विवाद सुरू झाला. तो तिला शिवीगाळ करीत मारहाण करू लागला. ती ही त्याला जशास तसे उत्तर देत घरातून निघून जाण्यास सांगत होती. पण तो मुलाला घेतल्या शिवाय मी जाणार नाही असे तो तिला सांगत होता. दोघे ही मुद्दावरून गुदयावर आले होते. दोघांचा ही वाद विकोपाला गेला. तो तयारीनेच तेथे आला होता. त्याने रागाच्या भरात आपल्याकडील चाकू काढला आणि तिच्या अंगावर सपा सपा असे वार केले. त्या वारात ती रक्ताच्या थारोळ्यात पडली. तिचा जागीच मृत्यु झाला. तिचा आपल्या हातून खून झाल्याचे बघून त्याने घराला बाहेरून कुलूप लावले आणि तेथून पळ काढला. या घटनेनंतर दोन दिवस झाले तरी काशव्वा करीकट्टी ही कामावर न आल्याने रविवार दि.१९ ऑक्टोंबर २०२५ रोजी कामावरील तिचा सहकारी हा तिच्या घराकडे गेला. तो तिच्या घराजवळ गेला असता त्याला घराला बाहेरून कुलूप दिसले. तसेच घरातून दुर्गंधी येत असल्याने त्याला वेगळीच शंका आली. त्याने बाजुच्या खिडकीतून आत डोकावून पाहिले असता त्याला काशव्वा करीकट्टी ही रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसली. त्याने या घटनेची माहिती शेजाऱ्यांना ही सांगितले. शेजाऱ्यांना ही घटनास्थळी येवून पाहिले. घटनास्थळी मोठी गर्दी झाली. कुणी तरी या घटनेची माहिती सौंदती पोलिसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचासमक्ष घराचे कुलूप तोडून काढले. पोलिसांनी घरात जावून पाहिले असता असता काशव्वा करीकट्टी ही रक्ताच्या थारोळयात पडली असल्याचे आणि तिच्या बाजुलाचा रक्ताने माखलेला चाकू पडला असल्याचे पोलीसांना दिसले. घटनास्थळी पो.निरी. प्रभाकर धर्मशेट्टी यांनी भेट देवून घटनेची पाहणी केली. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी ही घटनास्थळी भेट देवून घटनेची माहिती घेतली. पोलीसांना त्यांनी तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सौंदती येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेतील संशयीत आरोपी हा मयत काशव्वा करीकट्टीचा नवरा संतोष कांबळे असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. तसेच तो निपाणी पोलीसात कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. तसेच तो या घटनेनंतर तो घटनेनंतर पळून गेला असल्याने सौंदती पोलीसांचे एक पथक त्याच्या मागावर होते. निपाणी येथून सौंदती पोलीसांच्या पथकाने त्याला ताब्यात घेऊन सौंदतीला आणले. संतोष कांबळे हा पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असल्याने त्याने आपला गुन्हा कबुल केला त्याने गुन्हा कबुल केल्याने मयत काशव्वा करीकट्टी याच्या जवळच्या नातेवाईकाकडून या घटनेची फिर्याद घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी काशव्वा संतोष करीकट्टी (वय ३६) हिच्या खून प्रकरणी संतोष कांबळे (वय ३८) याच्या विरोधात आयपीसी कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला पोलीसांनी सौंदती येथील कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी जेलमध्ये केली.या घटनेचा पुढील तपास सौंदती पोलीस करीत आहेत.

## पैशांच्या वादातून निर्घृण हत्याकांड...

सासरे शिवराम गंगा गवळी व सासू रंगूबाई यांच्यासोबत पातळी, ता. सुरगाणा परिसरातील शेतात रहावयास गेला आहे. देवराम गावित आणि शिवराम गवळी हे एकमेकांचे व्याही आहेत. बुधवार दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता देवराम हे आपल्या व्याह्याकडे अर्थातच पातळी, ता. सुरगाणा येथे गेले होते. आपल्या लेकीचे सासरे आले म्हटल्यावर शिवराम यांनी त्यांचा यथोचित आदरसत्कार केला. देवराम यांनी तो आनंदाने स्विकारला. दिवसभर तेथे राहिल्यानंतर ते आपल्या घरी जाण्यास निघाले. आनंदाने घरी निघालेल्या देवराम यांना पुढे आपला काळ आला आहे याची जाणीव नव्हती. ते चालतच घरी जात असतांना अचानक त्यांच्यावर वाघाने हल्ला केला आणि त्या वाघाने त्यांच्या पोटातील आतडी बाहेर काढली. त्यांच्या तोंडावर पंजा मारून जखमी केले. त्यात त्यांचा मृत्यू झाला. आपल्या घरी आलेल्या व्याह्यावर वाघाने हल्ला केल्याची माहिती मिळाल्यावर तेही सुन्न झाले, पण स्वतःला सावरत त्यांनी याची माहिती आपल्या जावयाला म्हणजेच रामदास गावित याला दिली. रात्रीच्या वेळीच ही घटना घडली होती. साधारण पहाटे अडीच वाजता रामदासला याविषयी समजल्यानंतर त्याने लगेचच आपला धाकटा भाऊ हिरामण याला फोन केला आणि सांगितले, ‘तू सकाळी लवकर घरी ये.’ गाढ झोपेत असलेल्या हिरामणला काहीच लक्षात आले नाही. नेमके कशासाठी आपल्या भावाने घरी येण्यास सांगितले आहे? याचा विचार करतच तो पुन्हा झोपी गेला. त्यानंतर सकाळी साडेसहा वाजण्याच्या दरम्यान हिरामण याने रामदासला. फोन लावला? ’अरे, तू रात्री फोन केला होतास. मला सकाळी कशासाठी घरी बोलावलयंस. नेमकं काय झालंय रे?’ यावर रामदासने दीर्घ श्वास घेत त्याला सांगितले, ’अरे, काल (दि. ३ सप्टेंबर २०२५) संध्याकाळी ४ वाजता आपले वडील पातळी गावी गेले होते. ते माझे सासरे शिवराम गवळी यांच्या घरी गेले होते. तेथून घरी परत येत असतांना त्यांच्यावर वाघाने हल्ला केला. त्यांच्या पोटातील आतडी बाहेर काढली. तोंडावरही पंजामारला त्यात ते मरण पावले आहेत असे मला शिवराम गवळी यांनी कळवले आहे. आपल्या वडीलांचा मृतदेह माझ्या घरी आणला असून तू ताबडतोब इकडे ये.’ रात्रीच्या वेळी आपल्या भावाने सकाळी घरी येण्यास सांगितले होते, त्यामागे हे कारण आहे म्हटल्यावर हिरामणला रडूच कोसळले, पण स्वतःवर ताबा ठेवत तो आपल्या कुटुंबासह रामदासच्या घरी जाण्यास निघाला. रामदासच्या घरी गेल्यानंतर हिरामण याला वडील देवराम हे रक्तबंबाळ अवस्थेत पडलेले दिसून आले. त्यांच्या पोटातील आतडी बाहेर आली होती. तोंडावर गंभीर जखमा दिसत होत्या. हिरामण याने बारकाईने वडील देवराम यांच्या मृतदेहाची पहाणी केली. त्यांच्या अंगावरील जखमा पाहून त्याच्या मनात वेगळीच शंका निर्माण झाली. वाघाच्या हल्लयात जखमी झालेल्या या खुणा दिसून येत नव्हत्या, कारण तोंडावर व पोटावर कोणत्या तरीहत्याराने मारहाण झाल्याचा संशय हिरामणच्या मनात निर्माण झाला. वाघाच्या हल्लयात अशा जखमा होवूच शकत नाहीत. वडीलांसोबत काहीतरी घातपात झाल्याचे त्याला स्पष्टपणे दिसत होते. गावात देवरामवर वाघाचा हल्ला झाल्याची आणि त्यात ते मरण पावल्याची चर्चा सुरू झाली होती. सुरूवातीला लोकांच्या मनात भय निर्माण झाले होते. गावात वाघ शिरला आणि त्याने एकावर हल्ला करून ठार मारले म्हटल्यावर लोकही भयभीत झाले होते. गावात वाघ शिरला म्हटल्यावर वाघाच्या पायाचे ठसेदिसायला हवेत. तो कोठून आला आणि हल्ला करून कुठल्या बाजूने गेला याची गावातील लोकांकडूनपाहणी होवू लागली, पण वाघाच्या पंजाचे ठसे कोठेच आढळून आले नाहीत, त्यामुळे लोकही याबाबत चर्चा करू लागले. हिरामण आणि गावातील लोकांचे यावर एकमत झाले होते, म्हणून त्यांनी रामदासचे सासरे शिवराम यांना याविषयी विचारायला सुरूवात केली. ’अरे, तू म्हणतोयस. वाघानं हल्ला केलाय, पण तो वाघ कुठून आला आणि कुठल्या बाजूने गेलाय? तू पाहिलं का स्वतः?’ यावर शिवरामला काही सुचेनासे झाले तरीही उसने अवसान आणत तो म्हणाला, ’मी काय खोटं बोलतोय व्हयं रं. तुझ्या वडीलांवर वाघानंच हल्ला केलाय. ही काय आतडी बाहेर काढलीया. तोंडावरसुद्धा पंजा मारलेला दिसतोय की नाही.’ ’वाघ अशी आतडी बाहेर काढलं व्हय हो. ही तर कुठल्या तरी हत्याराने बाहेर काढलेली दिसतीया. वाघ आला म्हणता, तर त्याच्या पायाचं ठसं कसं दिसत नाहीत.’ यावर शिवरामला काही बोलायचे सुचेनासे झाले. दरम्यान कोणीतरी या घटनेची माहिती सुरगाणा पोलीस ठाण्यात दिली. माहिती मिळताच सुरगाणा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी शिवराम गवळी याच्यावर प्रश्नांचा भडीमार केला असता तो उडवाउडवीची उत्तरे देवू लागला, पण त्याचं हे अवसान काही वेळच टिकलं, कारण पोलिसांच्या प्रश्नांच्या भडीमारापुढे तो टिकला नाही. अखेर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. शिवराम गवळी आणि देवराम गावित यांच्यामध्ये पैशावरून वाद होता. त्या पैशासाठी देवराम हा शिवराम याच्या घरी आला होता, तेंव्हा शिवराम आणि त्याची पत्नी रंगूबाई यांनी त्याचे स्वागत केले आणि घरासमोरच ते तिघे जण म्हणजे शिवराम, रंगूबाई आणि देवराम हे दारू पिण्यास बसले. दारू चढू लागली तसा त्यांच्यात पैशाच्या कारणावरून वाद सुरू झाला. देवरामने शिवरामकडे पैशाची मागणी केली असता शिवराम आणि रंगूबाई हे दोघे जण प्रचंड चिडले आणि दोघांनी भांडणात कुऱ्हाड आणि फाळण्याने तोंडावर मारून त्यांच्या पोटातील आतड्याही बाहेर काढल्या. त्यात देवराम गावित मरण पावले. देवरामला ठार मारल्यानंतर भानावर आलेल्या शिवराम आणि रंगूबाईने बनाव रचला. त्यांनी आपला जावई रामदास याला सांगितले की, देवराम याच्यावर वाघाने हल्ला केला असून त्याच्या पोटातील आतडी बाहेर काढली, तसेच तोंडावर पंजा मारल्याने ते मरण पावले आहेत. रामदासलाही सासऱ्याने सांगितलेली गोष्ट पटली. सासऱ्याने जे सांगितले तेच त्याने हिरामणला सांगितले, पण हिरामणला मात्र ते पटले नाही. त्याच्या चाणाक्ष नजरेने हा घातपात असल्याचे ओळखले. शेवटी त्याच्या आणि गावातील लोकांच्या हुषारीने पोलिसांना बोलावून हा गुन्हा उघडकीस आणला. वडील देवराम गावित यांच्या खून प्रकरणी हिरामण देवराम गावित याने सुरगाणा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा रजि. नं. २०२/२०२३ बी. एन. एस. १०३ (१) व ३ (५) कलमाखाली शिवराम गंगा गवळी, रंगूबाई शिवराम गवळी रा. पातळी, ता. सुरगाणा या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजता शिवराम गंगा गवळी यांच्या पातळी येथील शेतातील घरासमोरच्या पडवीत देवराम गावित यांना शिवराम गंगा गवळी व रंगूबाई गवळी या नवरा-बायकोंनी काहीतरी अज्ञात कारणावरून कुऱ्हाड आणि फाळण्याने त्यांच्या तोंडावर व पोटावर मारून पोटातील आतडी बाहेर काढून जीवे ठार मारल्याचे हिरामण याने फिर्यादीत म्हटले आहे. वाघाच्या हल्लयात व्याह्याचा मृत्यू झाल्याचा बनाव शिवराम गवळी याने केला, मात्र वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी व पोलिसांनी याचा पर्दाफाश केला. आर्थिक देवाण-घेवाणीतून ही हत्या करण्यात आल्याचे उघडकीस आले. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपअधीक्षक किरणकुमार सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समाधान नागरे व सुरगाणा पोलीस अधिक तपास करत आहेत.

## मोबाईलवरून झालेला वाद जीवघेणा...

जयंतलाही लोक नावे ठेवत होते. पण जयंत हा ट्रॅव्हलर्स गाडीवर किल्नर म्हणून काम करीत असल्याने तो सहसा गावात कधी राहत नव्हता. तो सारखा कामाच्या निमित्याने फिरतीवर असल्याने त्याची आणि जावेदची भेट ही कधी तरी होत होती. जावेद हा गुंडगिरी प्रवृतीचा असल्याने कुणी त्याचेवर विश्वास ही ठेवत नव्हते. त्याला कुणी कधी कोणती वस्तु ही देत नव्हते. खरे तर त्याची परिस्तीती ही बेताचीच होती, परंतु तो वेड पांघरून पेडगावला जात आपण फार मोठे असल्याचे दाखवित होता. परंतु त्याला कधी कुणी काही देत नव्हते. त्यात जयंतची परिस्थीती ही तशी चांगली असल्याने तोच त्याला कधी तरी काही तरी देत होता. मागील काही दिवसात जावेदने त्याच्याकडे त्याचा मोबाईल काही दिवसासाठी वापरण्यास मागितला होता. मित्र म्हणून जयंतने त्याला आपला मोबाईल दिला ही होता. जावेद हा त्याचा मोबाईल वापरत असल्याने जयंतला कुणी तरी सांगितले की, जावेद हा त्याचा मोबाईल वापरत असल्याने त्याने त्या मोबाईलचा गुन्हेगारी कामा करिता वापर केला, तर जयंत हा तुच अडचणीत येईल जयंतला ही त्या मित्राचे म्हणणे पटले. तो जावेदकडे आपला मोबाईल सारखा परत मागत होता परंतु जावेद हा त्याला मोबाईल परत देण्यास सारखा टाळाटाळ करीत होता. तो काही आपला मोबाईल परत देत नाही हे जयंतने ओळखले.एकदा दोनदा दारू प्यायला बसले असताना देखील जयंतने त्याच्याकडे आपला मोबाईल परत मागितला परंतु जावेद हा मोबाईल राहू दे माझ्याकडे मी नंतर तुला मोबाईल देतो म्हणत होता. जयंतला आपण जावेदमुळे अडचणीत येवू असे वाटत होता. तो एकदा गाडीबरोबर गेला की चार आठ दिवस परत खानापुरला घराकडे येत नव्हता. त्यामुळे जावेदकडे मोबाईल परत मागायला त्याच्याकडे तेवढा वेळ ही नव्हता. तरी तो त्याला अधून मधून मोबाईल परत मागत होता. तो काही मोबाईल परत देत नाही हे जयंतने ओळखले. म्हणून तो दिवाळी सणानिमित्य घराकडे आला असताना जावेदच्या माघारी त्याच्या घरी जावून त्याने आपला मोबाईल परत आणला. जयंतने आपल्या माघारी मोबाईल परत नेल्याचा राग जावेद याला आला. त्याने त्याच्याबरोबर या कारणातून दोनदा भांडण ही काढले. या भांडणात तो त्याला म्हणाला तुझा मोबाईल काय सोन्याचा लागून गेला आहे का? तु मोबाईल माझ्या घरातून न सांगता का नेलास ते आधी सांग असे म्हणत तो त्याच्याशी वाद घालत होता. सोमवार दि. २० ऑक्टोंबर २०२५ रोजी जयंत हा दिवाळी सणा निमित्य ट्रॅव्हलर्स गाडी धुवत होता. तेथे जावेद हा गेला. रात्री आठच्या दरम्यान जावेदने जयंतला चल दारू प्यायला म्हणत बाहेर नेले. ते दोघे ही विजापुर गुहागर रस्त्यावरील हजारे हॉस्पिटलच्या मागे असलेल्या निर्जन ठिकाणी आले. तेथून थोडी लांब पाय वाट होती. त्या पाय वाटेपासून ते दोघे एका झाडाच्या आडोशाला अंधारात दारू प्यायला बसले. दारूचा एक एक पेग ते रिचवित असताना जावेदने मोबाईलचा विषय काढला. दोघे ही दारूच्या नशेत असल्याने दोघे ही एकमेकाला शिव्या देवू लागले. जयंतने त्याला मी काही तुला माझा मोबाईल वापरायला देवू शकत नाही असे स्पष्ट सांगितले. यावरून दोघांचा वाद वाढला. दोघे ही हाणामारीवर आले. जावेदने त्याच्या अंगावर जात त्याला खाली पाडून तुडवून मारायला सुरूवात केली. जयंत हा त्याच्या तावडीतून निसटून पळून जाण्याचा प्रयत्न करीत होता. मात्र जावेदने त्याला असे काही मारले की त्याला जागचे हालता देखील येत नव्हते. आधीच जावेदच्या रागाचा पारा चढला होता. तु तुझा मोबाईल माझ्या घरातून माझ्या माघारी परत का नेलास असे म्हणत तो रागाने लालबुंद झाला होता. त्यातच रागाच्या भरात जावेदने आपल्या कडील चाकू काढून तो जयंतच्या गळयावर सरकन फिरविला. तसे जयंतच्या गळयातून रक्ताची चिळकांडी उडाली. तो रक्ताच्या थारोळ्यात टाचा घासू लागला तो जिवांच्या आकांताने मला वाचवा वाचवा म्हणत होता. परंतु रात्रीच्या अंधारात त्या निर्जन स्थळी त्या दोघा शिवाय तेथे कुणी नसल्याने त्याचा आवाज ऐकायला तेथे कुणी नव्हते. काही क्षणातच जयंत हा अतिरक्त स्त्रावाने जागीच मयत झाला. जयंत हा टाचा घासत आपल्या डोळ्यासमोर मेला याचे जावेद याला काही सोयर सुतक नव्हते. तो आपल्या हातात रक्ताने माखलेला चाकू घेऊन तेथे उभा होता. काही वेळाने तो शांत मनाने तेथून जणू काही झालेच नाही अशा अविर्भावात तेथून निघून गेला. त्या रात्री पायवाटेने जाणाऱ्या एकाला एका तरूणाचा रक्ताच्या थारोळयात पडलेला मृतदेह दिसला. त्याने या घटनेची माहिती हजारे हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांना सांगितली.त्यांनी घटनास्थळी जावून पाहिले. या घटनेची माहिती त्यातीलच एकाने विटा पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच विटा पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात एका तरूणाचा मृतदेह पडला असल्याचे पोलिसांना दिसले. त्या तरूणाच्या गळ्यावर चाकूने वार करून त्याचा खून केल्याचे दिसत होते. घटनास्थळी दारूचे रिकामे ग्लास, दोन बाटल्या, स्नॅक्स आणि लांब अंतरावर चप्पल पडलेले दिसत होते. घटनास्थळी पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे यांनी भेट दिली. त्यांनी घटनेची माहिती घेऊन पोलिसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. मयत तरूणाची ओळख ही त्याच्या पॅन्टच्या खिशातील कागदपत्रावरून पोलीसांनी पटवली. मयत तरूण खानापूरातील जयंत भगत असल्याची पोलीसांना समजले. त्यांनी या घटनेची माहिती मयत जयंत भगत याच्या घरच्या लोकांना दिली. ते ही या घटनेची माहिती मिळताच तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ही मयत तरूण हा जयंत भगत हा असल्याचे पोलीसांना सांगितले. पोलीसांना मयत तरूणाची ओळख पटल्यावर त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी विटा येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असता मयत जयंत भगत हा घटनेच्या वेळी त्याचा मित्र जावेद अतार याच्याबरोबर तेथे आला असल्याचे पोलिसांना समजले. मयत जयंत याचे जावेद बरोबर मोबाईल परत देण्यावरून भांडण ही झाले असल्याचे पोलीसांना समजले. घटनास्थळावरून संशयीत जावेद आतार हा पळून गेला असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. घटनेनंतर तो एका शेतात लपून बसल्याचे पोलीसांना समजल्यावर पोलीस उप निरीक्षक विशाल येळेकर याच्या पथकाने त्याला त्या शेतातून रात्रीच ताब्यात घेतले. त्याला विटा पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची पोलीस चौकशी करीत असताना तो पोलिसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होता. पोलिसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना त्याने दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने या घटनेची लेखी फिर्याद मयत जयंतभगत याच्या नातेवाईकाकडून पोलीसांनी घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी जयंत विश्वास भगत (वय ४०) याच्या खुन प्रकरणी त्याचा मित्र जावेद मुबारक आतार (वय ३७) याच्या विरोधात भा.दं.वि. कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. विटा पोलीसांनी त्याला विटा येथील न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने जावेद आतार याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलिसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेचा पुढील तपास विटा पोलीस करीत आहेत. मित्र हा किती ही जवळचा असला तरी त्याच्या बरोबर कोणताही व्यवहार हा जपूनच करावा लागतो गुन्हेगारी प्रवृतीच्या लोकाबरोबर कधीच मैत्री करू नये नाही तरी त्याचे परिणाम वेगळे होतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## पाठलाग करणारा तरुण इरेला पेटला...

माहिती पोलिस अधीक्षक पुणे ग्रामीण संदीपसिंह गिल्ल यांनी दिली. दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास गगन आकांक्षा सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत एका युवतीचा मृतदेह आढळून आला होता. युवतीचे नाव पूनम विनोद ठाकूर (वय २०, रा. गगन आकांक्षा सोसायटी, कोरेगाव मुळ, ता. हवेली, जि. पुणे) असे आहे. तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झालेली असून घटनास्थळी रक्ताचे डाग, मोबाईल आणि चप्पल पडलेली होती. या प्रकरणी तिचा भाऊ मनिष ठाकूर यांनी उरुळी कांचन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. घटनास्थळी तातडीने मा. पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण संदीपसिंह गिल्ल यांनी भेट देऊन पाहणी केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा आणि उरुळी कांचन पोलिस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांच्या चार स्वतंत्र पथकांनी तपासाची चक्रे वेगात फिरवली. तपासादरम्यान सुमारे ६० ते ७० सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले तसेच २०० हून अधिक व्यक्तींची चौकशी करण्यात आली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक संशयित तरुण मोटारसायकलवरून घटनास्थळाच्या दिशेने जाताना दिसला. पुढील तपासात गोपनीय बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीनुसार संशयिताची ओळख दिनेश संजय पाटोळे (वय २६ रा. गोळेवस्ती, उरुळी कांचन) अशी पटली. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. तपासात उघडकीस आले की, युवती रोडने पायी जात असताना आरोपीने तिचा पाठलाग केला. आरोपीने तिच्याकडे शरीरिक संबंधांची मागणी केली असता युवतीने नकार देऊन विरोध केला. त्यावरून आरोपीने तिचा रागाच्या भरात डोक्यात दगड मारून खून केला. या प्रकरणात आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली स्प्लेंडर मोटारसायकल (एम एच १२ एस झेड - ६९६५ जप्त करण्यात आली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याची २७ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी मिळाली आहे. ही यशस्वी कारवाई विशेष पोलिस महानिरीक्षक श्री. सुनिल फुलारी (कोल्हापूर परिक्षेत्र) यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलिस अधिकारी बापूराव दडस यांच्या सूचनांनुसार करण्यात आली आहे.

27 OCTOBER TO 02 NOVEMER 2025 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 10/25/2025 7:36 PM Page 1



# ठाणे जिल्ह्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्वबळावर निवडणूक लढविण्याची शिवसेनेची तयारी



**भिवंडी : वार्ताहर**

ठाणे जिल्ह्यात होणाऱ्या आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुका संदर्भात महायुती बाबत कोणताही निर्णय होत नसताना शिवसेना पक्षाने एकला चलो रे च्या मार्गाने तयारी सुरू केली असून जिल्हा परिषद व पंचायत समिती लढविण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती सुरू केल्या आहेत.

मिनी विधानसभा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीसाठी सर्व पक्षांकडून मोर्चेबांधणीस सुरवात झाली आहे. ठाणे जिल्ह्यातील महायुतीचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कडून होणे अपेक्षित असताना, शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने शिवसेनेने स्वबळावर निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली असून जिल्हा परिषदेच्या २१ जागां करीता मुलाखती घेण्याची सुरुवात जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू केली आहे. यामुळे भाजपासह मित्र पक्षात खळबळ उडाली आहे. शिवसेनेने सुरू केलेल्या मुलाखती साठी इच्छुक उमेदवारांनी उस्फूर्तपणे सहभाग घेत निवडणुकी साठी जिल्हाप्रमुखांकडे अर्ज भरून देत जिल्हा परिषद गटात निवडणूक लढविण्याची तयारी दर्शविली आहे. आगामी होणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या त्याचबरोबर नगरपरिषद व महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजप शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्यावतीने निवडणुका लढविण्यासाठी चर्चा सुरू झाली आहे. मात्र याबाबत अद्यापही कोणत्याही निर्णय लागत नसल्याने ठाणे ग्रामीण पंचायत समिती गण व जिल्हा परिषद गटामध्ये शिवसेनेचे पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांच्या उपस्थितीत २१ जिल्हा परिषद गटातील उमेदवारांच्या मुलाखती कशेळी येथील शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख कार्यालयात गुरुवारी (२३) रोजी सकाळी आयोजित करण्यात आल्या होत्या. यावेळी

## इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती सुरू

शिवसेनेचे उपनेते रुपेश म्हात्रे, अरुण पाटील निलेश सांबरे लोकसभा संपर्कप्रमुख मदन नाईक महिला आघाडीच्या मोनिका पालवे,कशेळी सरपंच वैशालीताई थळे, तालुकाप्रमुख इंद्रपाल तरे, युवासेनेचे प्रभुदास नाईक हे मुलाखती घेण्यासाठी उपस्थितीत होते. आगामी निवडणुका लढविण्यासाठी शिवसेना सज्ज झाली असुन शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी कामाला सुरुवात करावी. पक्ष देईल तो उमेदवार निवडून आणण्या साठी शर्थीचे प्रयत्न करावेत, त्यासाठी सर्वांनी आपसातील मतभेद विसरून एकदिलाने काम करावे आणि ठाणे जिल्हा परिषदेवर शिवसेना भगवा फडकवा असे आवाहन पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी केले. तर शिवसेना पक्षा प्रमुख एकनाथ शिंदे व जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे आणि निवडणूक जिंकण्यासाठी कामाला लागावे पक्ष शिस्तही महत्त्वाची आहे ती टिकली तर आपण विजय होऊ असा विश्वास यावेळी शिवसेना उपनेते निलेश सांबरे यांनी व्यक्त केला. जिल्हा परिषदेची उमेदवारी मिळावी यासाठी अंबाडी, गणेशपुरी, मोहंडूळ, राहनाळ, काल्हेर, पडघा बोरीवली, कोनगांव, अंजूर दिवे, खारबाव अशा विविध जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील इच्छुक उमेदवार तसेच पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरन्यायाधीश डॉ.भूषण गवईवरील हल्ल्याचा निलंग्यात निषेध




**देवणी : वार्ताहर**

देशाचे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डॉ.भूषण गवई यांच्यावर सर्वोच्च न्यायालयात एका मनुवादी वकीलाने बूट फेकून केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ निलंगा शहरात संविधानप्रेमी नागरिकांनी मूक मोर्चा काढून जाहीर निषेध नोंदविला. संविधान, न्याय आणि समतेच्या तत्त्वांवर आधारित देशात सरन्यायाधीशांवर झालेला हा प्रकार भारतीय न्यायव्यवस्थेवरचा व संविधानावरचा थेट हल्ला असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. या घटनेमुळे देशाची मान जागतिक पातळीवर शरमेने झुकली असल्याचे उपस्थित नागरिकानी सांगितले. संविधानप्रेमी व आंबेडकरवादी जनतेने दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी मूक मोर्चा काढून उपविभागीय अधिकारी, निलंगा यांना निवेदन सादर केले. या निवेदनात म्हटले आहे की, मनुवादी वकील राकेश किशोर तिवारी याने डॉ. भूषण गवई साहेब यांच्यावर बूट फेकून केलेले कृत्य देशद्रोहासमान असून त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच त्याचे भारतीय नागरिकत्व रद्द करण्यात यावे आणि अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्व न्यायालयांमध्ये सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मोर्चाच्या शेवटी नागरिकांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून सरन्यायाधीशांविषयी ऐक्य व समर्थन व्यक्त केले.

### संविधानप्रेमींचा स्पष्ट इशारा

डॉ. गवई यांच्यावरचा हल्ला म्हणजे न्याय व समतेच्या तत्त्वांवर प्रहार आहे. संविधानाचा अपमान सहन केला जाणार नाही! यावेळी मंजुषा निंबाळकर, ॲड.जे.बी.सूर्यवंशी, रजनीकांत कांबळे, विलास सुर्यवंशी, वामन कांबळे, विजयकुमार सुर्यवंशी, दाजीबा कांबळे,अंकुश कांबळे, देवदत्त सुर्यवंशी, गिरीश पात्रे, रोहन सुरवसे, साहेब कांबळे, अरविंद कांबळे, बंटी कांबळे, प्रकाश कांबळे आदी प्रमुख कार्यकर्त्यासह मोठ्या संख्येने महिला व पुरुष सहभागी होते, यावेळी काँग्रेस पक्षाचे अभय साळुंके, अजित माने, हमीद शेख, यांनी निषेध नोंदवून मोर्चास पाठिंबा जाहीर केला.

# रोटरी परिवाराच्यावतीने पुरग्रस्तांना 'शिधा किट्स' वाटपाने सणासुदीच्या काळात 'दिवाळी झाली गोड'

**लातूर : वार्ताहर**




लातूर जिल्ह्यात अतिवृष्टी व पुराच्या पाण्याने अनेकांच्या घरात पाणी शिरुन संसारउपयोगी वस्तूंचे नुकसान झाले. ऐन सणासुदीच्या काळात नागरिकांवर दु:खाचा डोंगर कोसळला अशा वेळी लातूर शहरातील रोटरी कॉप्स लातूर, रोटरी आधार रुग्ण सेवा केंद्राच्या अध्यक्षा रो. डॉ. माया कुलकर्णी यांनी पुढाकार घेत पुरग्रस्त नागरिकांसाठी 'रोटरी आधार सहाय्यता शिधा किट्स'चे वाटप करुन दिपावली सण साजरा करण्यासाठी मदत केली. या मदतीमुळै व त्यांच्या सोबत केलेल्या संवादामुळे पुरग्रस्त नागरिकांना मोठा आधार मिळाला.रोटरी परिवाराकडून नेहमीच मोठ्याप्रमाणात समाज कार्य करण्यात येते. समाजातील वंचीत घटकांसाठी रोटरीचे सदस्य पुढाकार घेऊन कार्य करतात. मागील काळात झालेल्या अतिवृष्टी व पुराच्या पाण्याने अनेकांच्या घरात सण साजरा करण्यासाठी काही शिल्लक राहिले नाही याची जाणीव ठेऊन रोटरी कॉप्स रोटरी आधार रुग्ण सेवा केंद्र व रोटरी परिवारच्या माध्यमातून कॉप्स व रोटरी आधार रुग्ण सेवा केंद्राच्या अध्यक्षा रो. डॉ. माया कुलकर्णी, सचिव रो. डॉ. गुणवंत बिरादार, लातूर रोटरी कल्बचे अध्यक्ष रो. झाकी कायमखानी, मिड टाऊनचे अध्यक्ष रो. अमोल दाडगे, मेट्रोचे अध्यक्ष रो. राहूल धरणे, सेंट्रलचे अध्यक्ष रो. बाळासाहेब खैरे, होरायझन चे अध्यक्ष रो. डॉ. गुणवंत बिरादार, श्रेयशचे अध्यक्ष रो. शिवराज मिसाळ यांनी पुरग्रस्त नागरिकांची दिवाळी गोड व आनंदी व्हावी यासाठी खारीचा वाटा उचलत रोटरी आधार सहाय्यता शिधा किट्स वाटप उपक्रम होती घेतला. या उपक्रमा अंतर्गत हरवाडी, मळवटी, खुलगापूर व बोपला गावातील पूरग्रस्त नागरिकांना शिधा किट्स, चटई व रजईचे वाटप करण्यात आले.या शिधा किट्सच्या वाटपाच्या वेळी पूरग्रस्त नागरिकांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसून आला. रोटरीच्या या उपक्रमामुळे पुरग्रस्त नागरिकांना त्यांच्या सणाच्या वेळी निश्चितपणे आधार मिळाला आहे. रोटरी कॉप्स लातूर, रोटरी आधार रुग्ण सेवा केंद्र व रोटरी परिवार यांच्या या उपक्रमाचे पुरग्रस्त नागरिकांनी आभार मानले. रोटरीच्या या उपक्रमामुळे पुरग्रस्त नागरिकांच्या जीवनात एक नवीन आशा व उमेद निर्माण झाली आहे. या प्रसंगी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. सुधीर लातूरे, पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर हरिप्रसाद सोमाणी, डॉ. सुचित्रा भालचंद्र, डॉ. भास्करराव पाटील, डॉ. भास्करराव बोरगावकर, प्रेसिडेंट रोटरी क्लब श्रेयस रो. शिवराज मिसाळ, सेक्रेटरी रो. उषा शिंदे, रो. प्रकाश निला, रो, रजनी वैद्य, रो. ज्योती मंगलगे, प्रेसिडेंट रोटरी क्लब लातूर मिडटाउन रो. अमोल दाडगे, रो. नागनाथ कलवले, रो. शशिकांत चलवाड, रो. डॉ विश्वास कुलकर्णी, डॉ. अनुजा कुलकर्णी, खुलगापूरचे सरपंच रणखांब हरवाडीचे सरपंच माने, बोपलाचे सरपंच अरुण पाटील, अनंत सांडूर रोटरी कॉप्स लातूरचे पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

# कै.रसिका महाविद्यालयाचा फुटबॉल संघास यश

**देवणी : वार्ताहर**




स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ रोजी संपन्न झाल्या. या स्पर्धेत कै. रसिका महाविद्यालयाच्या खेळाडूंनी नेत्रदीप यश संपादन केले आहे. मुलाच्या संघाने अटीतटीच्या अंतिम सामन्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

संघात एजाज शेख (कर्णधार), मोमीन कलीम, पतंगे प्रेम, जनक कोयले, बोडके सुशांत, तोडकर अभिजीत, म्हेत्रे लहू, बिरादार अभिषेक, शेख शोहेब मुर्शिद अरमान, खेडेकर फैजान, गायकवाड पिराजी, म्हेत्रे स्वप्निल, जाधव माऊली यांचा समावेश होता. या खेळाडूंना प्रा.डॉ. सचिन चामले यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या खेळाडूंच्या यशाबद्दल संस्था अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, सचिव गजानन भोपणीकर व सर्व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांतर्फे तसेच प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी खेळाडूचे अभिनंदन केले आहे व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.




# देवणी पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक पद बऱ्याच दिवसांपासून रिक्त

**देवणी : वार्ताहर**




देवणी पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक हे पद बऱ्याच दिवसापासून रिक्त आहे. या ठिकाणी सातत्याने सहायक पोलीस निरीक्षक देऊन हे पोलीस ठाणे चालविले जात आहे या पोलीस ठाण्याला पोलीस निरीक्षक मिळत नाही का? हा प्रश्न अनुत्तरीत आहे पोलीस अधीक्षक अमोलजी तांबे साहेब देवणी पोलीस ठाण्याला पोलीस निरीक्षक दर्जाचा अधिकारी देता का.. हो? अशी मागणी देवणी तालुक्यातून होतं आहे देवणी हा सीमावर्ती तालुका आहे या तालुक्याला पाच सहा किमी अंतरावर कर्नाटक राज्य आहे महाराष्ट्रात सध्या गुटखा बंदी आहे. त्यामुळे कर्नाटक राज्यातून सर्वाधिक गुटखा तस्करी होतं असते गावा गावात विकली जाणारी अवैध दारू अवेद्य ताडी, मटका, विविध प्रकारची तस्करी, गावा गावात जातीय तेढ आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पंचायत व तालुक्यात अनेक ग्रामपंचायतीच्या निवडणुका मोठ्या प्रमाणे असल्यामुळे या तालुक्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नकारता येत नाही त्यामुळे देवणी पोलीस ठाण्याला पोलीस निरीक्षक द्या? अशी मागणी होतं आहे यापूर्वी काही सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी भारतीय राज्य घटनेच्या चौकटीत राहून पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शना खाली उत्तम असे प्रशासन चालविले आहे त्यामुळे पोलीस निरीक्षक यांची गरज देवणी तालुक्याला भासली नाही मात्र सध्या अवैध धंद्याने डोकं वर काढले आहे महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने सर्वच निवडणूक प्रक्रिया चालू केल्या असल्यामुळे कायदा सुव्यवस्था तालुक्यात अबाधित ठेवण्यासाठी त्यांचे योग्य नियोजन करण्यासाठी देवणी पोलीस ठाण्याला पोलीस निरीक्षक दर्जाचा अधिकारी देण्यात यावा सध्या लातूर मुख्यालय येथे बरेच पोलिस निरीक्षक दर्जाचे वरिष्ठ अधिकारी बसून आहेत, त्यापैकी एखादा कर्तव्य दक्ष व निष्कलंक अधिकारी देवणी पोलिस स्टेशनला द्यावे अशी मागणी देवणीतील नागरिकांतून केली जात आहे.

# निसर्ग ग्रीन संकुलनमध्ये दीवाळी पहाट कार्यक्रम संपन्न

**अंबरनाथ : वार्ताहर**



अंबरनाथ पूर्व निसर्ग ग्रीन संकुल येथे आमदार डॉक्टर बालाजी किनीकर विकास प्रतिष्ठान व लोकशक्ती फाउंडेशन च्या वतीने भव्य दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अंबरनाथ पूर्व येथील निसर्ग ग्रीन सिटी च्या प्रांगणात पहाटेपासून गायनाचा कार्यक्रम सुरू होता यामध्ये भगवान पांडुरंगाच्या विठ्ठलाच्या नामस्मरणाने भावगीते भक्ती गीतांनी परिसर भक्तीमय झाला होता दिवाळी भेट म्हणून सर्व संकुलातील सुरक्षारक्षकांना देखील भेटवस्तू आमदार बालाजी किनीकर यांच्या हस्ते देण्यात आल्या. याप्रसंगी लोकशक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष विनोद पोखरकर, माजी नगरसेवक अशोक गुंजाळ शिवसेना महिला विधानसभा संघटक सुषमा रसाळ, संघटक सोमय्याताई गावडे, संतोष शिंदे, तसेच निसर्ग ग्रीन संकुलातील मोठ्या संख्येने महिला व नागरिक उपस्थित होते.

www.crimesandhya.com
४ लातूर/पालघर/सोलापूर
क्राईम संध्या
सोमवार दि. २७ ऑक्टोबर २०२५ ते रविवार दि. २ नोव्हेंबर २०२५
शुभ दिपावली

# सावधान! सोशल मीडिया वरून संघाचा दंगली पेटवण्याचा डाव!

या देशात प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य आहे. त्यामुळे माणसाने आपल्या धर्माचा अभिमान बाळगणे यात काहीही गैर नाही. पण आपल्याधर्माचा अभिमान बाळगताना दुसऱ्याच्या धर्मावर टीका टिप्पणी करणे आणि तेही समाजमाध्यमांवर अशा गोष्टी करणे योग्य नाही. कारण यातून धार्मिक तणाव निर्माण होतो आणि धार्मिक तणाव दोन समाजात तेढ निर्माण करतो. दंगलींना कारणीभूत ठरतो.यात आग लावणारे बाजूला होतात. पण समाज मैत्री जातीय किंवा धार्मिक तणावात होरपळून निघतो. जातीय दंगली किती भयंकर असतात आणि त्यात सामान्य माणसाचे काय हाल होतात हे अनेक वेळा या देशाने पाहिले आहे. खास करून बाबरी मशीद पाडल्यानंतर जी दंगल उसळली त्यात हजारो निरपराध लोक मारले गेले. त्यामुळे भविष्यात असे तणाव निर्माण होऊ नयेत यासाठी ज्या उपाययोजना करायला हव्या होत्या त्या करण्यात आल्या नाहीत उलट धार्मिक वाद पुन्हा उफाळून येण्यासारखी परिस्थिती निर्माण केली जात आहे आणि याला आर एस एस सारख्या जातीयवादी संघटना कारणीभूत आहेत. २014 मधे या देशात नरेंद्र मोदींचे सरकार आल्यापासून देशातील धार्मिक तणाव वाढीस लागला आहे आणि या धार्मिक तणावाला सोशल मीडियावरून काही लोक हवा देत आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश गवई यांच्यावर एका माथेफिरू वकिलाने बूट फेकण्याचा प्रयत्न केल्यापासून सोशल मीडियावर दोन्हीकडून आरोप प्रत्यारोपणाची जी चिखलफेक सुरू झाळाी आहे. त्यात जातीय विद्रेषाची बीजे रोवली जात आहेत अगदी भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या बदनामीपासून संघाच्या जातीयवादी धोरणाचे समर्थन करण्यापलीकडे खूप काही चाललेले आहे आणि सोशल मिडियावरील या भडकाऊ पोस्ट दिसत असतानाही पोलिस आणि सरकार गप्प आहे. अशाच पिकांच्या भडकाऊ पोस्टमुळे देशाच्या विविध भागात जातीय दंगली करण्यात आल्या होत्या. तसाच प्रकार पुन्हा व्हावा म्हणून सोशल मीडियावर लोकांची माथी भडकवणाऱ्या पोस्टवघातल्या जात आहेत. अगदी एखाद्याला आय वाहिनीवरून शिव्या घालण्यापर्यंत या लोकांची मजल गेली आहे आणि यात हिंदुत्ववादी माथेफिरूनचे प्रमाण अधिक आहे.अशा पोस्टमुळे ही लोक दुसऱ्याची मारतील आणि स्वतःही मारतील. अर्थात अशा विकृत मनोवृत्तीचे लोक मेले तरी चालतील पण देशाचे, समाजाचे नुकसान होत नये.या अशाच पोस्टमुळे राष्ट्रीय स्वयं सेवक संघांकडून हिंदू तरुणांची माथी भडकवण्याचा तयारी सुरू आहे. संघाच्या सर्व दुष्कृत्यांचे समर्थन करणाऱ्या वादग्रस्त पोस्ट टाकल्या जात आहेत. सरकारचा अर्थातच कुठेतरी त्याला पाठिंबा आहे. त्यामुळे अशा पोस्टकडे दुर्लक्ष केले जात आहे. संघाच्या विरोध पोस्ट करणाऱ्यांना आय वाहिनीवरून शिव्या दिल्या जात आहेत. धमक्या दिल्या जात आहेत. पण अशा धमक्यांना जराही न घाबरता हिंदू धर्मातीलच काही विचारवंत संघाच्या बिनडोक अंधभक्तांना त्यांच्याच भाषेत उत्तरे देत आहेत. त्यामुळे सोशल मिडियावरील हा संघर्ष कधीतरी मोठ्या दंगलीत रूपांतरित होऊ शकतो. आपल्याकडे पोलिसांचा सायबर सेल आहे आणि स्फोटक पोस्ट विरुद्ध कायदाही आहे. तरीसुद्धा जातीयवादी संघाच्या अंध भक्तांच्या वादग्रस्त पोस्टकडे दुर्लक्ष केले जात आहे. तरुणांमध्ये जातीयवादाचे विष पेरण्यासाठी आता महाविद्यालयांच्या गेटवर संघाचे स्वयंसेवक हिंदू विद्यार्थ्यांना संघाचे सभासद बनवून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. यात जर ते यशस्वी झाले तर या देशात हिंदू विरुद्ध इतर समाज असा मोठा संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सरकारने विषाची परीक्षा बघू नये. लवकरात लवकर ही सर्व थांबवण्यासाठी प्रयत्न करावेत. अन्यथा परिस्थिती हाताबाहेर जाईल. कर्नाटकमध्ये असेच परकार सुरू होते, त्यामुळे तिथे संघावर बंदी घालण्यात आली. पण महाराष्ट्र सरकार मध्ये संघाशी संबंधित आणि पूर्वी हाप चड्डीत लाठ्याकाठ्या फिरवणारे आता महाराष्ट्राच्या सत्तेत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात संघावर बंदी घातली जाणार नाही. उलट ज्या महाराष्ट्राने देशाला एकसंघ ठेवण्यासाठी समतेचा संदेश दिला त्या महाराष्ट्रात सरकारच्या पाठिंब्याने मनुवादी विचार पुन्हा सक्रिय करण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि या मोहिमेत सरकार मधील वामन सक्रिय आहेत. सोशल मीडियावर संघाची ध्येयधोरणे पेरण्यासाठी त्यांनीच मनसे पेरलेली आहेत. मात्र ही थांबले नाहीत. तर महाराष्ट्रातले सर्व सोशीत पिढीत आणि हिंदुत्ववाद्यांच्या द्वेषाचे टार्गेट ठरलेला मुस्लिम समाज आदी सारे मिळून एकत्र येतील. त्यानंतर जे बंगला देशात झाले, जे श्रीलंकेत झाले. जे नेपाळमध्ये झाले त्याहीपेक्षा भयंकर भारतात होईल. तेंव्हा पोलिसांनी आणि सरकारने सोशल मिडियावरील जातीय संघर्ष थांबवावा आणि जे कुणी जाती धर्माच्या नावाने वादग्रस्त पोस्ट टाकतील त्यांच्यावर कारवाई करावी.

# श्री वज्रयोगिनी आई वज्रेश्वरी देवी पालखी उत्सवाचा मान पालघर जिल्ह्यातील डोंगरपाडा प्रांत विरार गावास प्रदान!



**वसई : वार्ताहर**

इ.स १७३९ ऐतिहासिक वसई विजयानंतर उत्तर कोकणातील गडकिल्ल्यांवर, गावागावांत मराठमोळे सण उत्सव पुन्हा नियमितपणे सुरू झाले. पोर्तुगीजांच्या धार्मिक व सांस्कृतिक अत्याचारास बळी पडलेल्या देवदेवतांची व पौराणिक मंदिराची पुन्हा उभारणी करण्यात आली. गावागावांतून देवतांची पालखी मिरवणूक, गोंधळ उत्सव इत्यादी परंपरा पुढील शंभर वर्षे सुरू राहिल्या. १८व्या शतकात महाराष्ट्र प्रांताच्या राजकारणात शिरकाव केलेल्या ब्रिटिश सरकारने सर्व सण, उत्सव, समारंभावर बंदी आणली. यातच अनेक गडकिल्ले, ऐतिहासिक मंदिरे यांवर जाण्यासाठी असणारे मार्गच बंद उध्वस्त करण्यात आले. पुढील १५० वर्षे गडकिल्ल्यांच्या पालखी सोहळ्याचा खेळखंडोबा होत पालखी सोहळे बंद होण्याच्या मार्गावर लागले. पुन्हा भारत देशास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ऐतिहासिक कागदपत्रे नोंदीचे संशोधन मागे पडले व पाश्चात्य संस्कृतीचे नवीन वादळ समोर आल्याने पालखी उत्सवाला वाली उरला नाही. आज महाराष्ट्रात काही मोजक्याच गडकोटांवर पालखी सोहळा, ऐतिहासिक विजयोत्सव परंपरा सुरू आहेत. नरवीर चिमणाजी आप्पांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी इसवी सन १७३९ मध्ये पोर्तुगीज राजवटींचे समूळ उच्चाटन करून उत्तर कोकणात सर्व उत्सव, परंपरा पुन्हा सुरू केल्या. आज त्याच इतिहासाचे वंशज म्हणून या परंपरा, उत्सव जपण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन ठेपली आहे. किल्ले वसई मोहीम परिवार अंतर्गत २००३ सालापासून उत्तर कोकणातील दुर्गांवर ऐतिहासिक विजयोत्सव, देवतांचे पालखी सोहळा, दुर्गसंवर्धन, दुर्गसंशोधन इत्यादी परंपरा जपण्यासाठी अविरतपणे कष्ट घेण्यात येत आहेत. याच मोहिमेचा एक भाग म्हणून २०२६ साली होणाऱ्या श्री वज्रयोगिनी आई वज्रेश्वरी देवी पालखी उत्सवाचा मान पालघर प्रांतातील डोंगरपाडा प्रांत विरार गावास प्रदान करण्यात आलेला आहे. सन १७३९ ते २०२६ हा पालखी उत्सवाचा कालखंड पाहता यंदा पालखी सोहळ्याचे २८७ वे वर्षे व केळवे माहीम विजयोत्सवाचे २८८ वे वर्षे आहे. वसई मोहिमेच्या रणसंग्रामात विरार मधील जीवधन डोंगर, अर्नाळा कोट, शिरगाव माडी, आगाशी माडी या ऐतिहासिक स्थळांच्या घेऱ्यात अनेक गावांचा सहभाग होतो. या विविध गावांतील शिलेदारांनी वसई मोहिमेत व नंतरच्या कालावधीत महत्वाचे योगदान दिले आहे. पालघर जिल्ह्यातील पाडा ही नामावली धारण केलेल्या गावांनी मराठेशाहीला धान्य रसद पुरवठा केलेला आहे. ऐतिहासिक कागदपत्रांचा मागोवा घेताना वसई विरार सोपारा प्रांतातील गावांनी मराठेशाहीच्या इतिहासात वेळोवेळी पुरवलेली सर्वोतोपरी रसद तपशीलवार नमूद आहे. यात भात उडीद इत्यादी धान्य नमूद आहे. विशेष म्हणजे येथील काही शेतांची नावे श्रीदत्त राऊत यांनी संशोधन करून पुढे आणली आहेत. यात माणिकपूर पाडा, आगाशी पाडा, डोंगर पाडा, बाहाद्दरपूर पाडा, निळे मोरे, गास अशी गावे आजही इतिहास जपत आहेत.

या गावांत पिढ्यानपिढ्या पुजलेली स्थानिक ग्रामदैवते यांचा ज्ञात अज्ञात इतिहास आहे. विरार प्रांताचा भव्य इतिहास लक्षात घेऊन डोंगरपाडा गावाने पालखी सोहळ्याची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली आहे. १९ ऑक्टोबर २०२५ रविवार रोजी समस्त ग्रामस्थांच्या सोबत आयोजित केलेल्या मार्गदर्शन बैठकीत ऐतिहासिक पालखी सोहळ्याबाबत किल्ले वसई मोहीम प्रमुख व इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी स्थानिक मान्यवर ग्रामस्थ व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यंदा १० व ११ जानेवारी २०२६ रोजी श्री वज्रेश्वरी देवी पालखी उत्सव, केळवे माहीम विजय दिन उत्सव साजरा करण्यात येणार आहे. श्री वज्रेश्वरी देवी पालखी उत्सव व केळवे माहीम विजयोत्सव हा अमूल्य सांस्कृतिक ठेवा जपण्यासाठी समस्त भाविक व दुर्गमित्र सातत्याने कटिबद्ध आहेत.

# विरार येथे भरत म्हात्रे संचलित सुंदर गाण्यांचा 'स्वर दीपावली' रसिकांसाठी उत्तम मेजवानी ठरला






**विरार : वार्ताहर**

स्वर दीपावली हा भरत म्हात्रे संचलित गाण्यांचा अतिशय सुंदर कार्यक्रम पद्मश्री भाऊसाहेब वर्तक सभागृह येथे आज सोमवार सकाळी ६.३० वाजता सुरू झाला.

या कार्यक्रमात मराठी व हिंदी भाषेतील विविध गाण्यांचे प्रकार सादर करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रभू विघ्नहर्ता या गाण्याने झाली, त्यानंतर साईबाबा बोलो, आली माझ्या घरी ही दिवाळी, कोळीगीत, पद्मनाभा नारायणा, लावण्या, भुपाळ्या, यावर कळस चढवला भरत म्हात्रे यांनी गायलेल्या ढलता सूरज धीरे धीरे या कव्वालीने. कार्यक्रमाची सांगता हेचि दान देगा देवा या भैरवीने करण्यात आली. गेली ३५ वर्ष सातत्याने विनामूल्य रसिकांसाठी यंग स्टार ट्रस्ट अध्यक्ष माजी आमदार हितेंद्र ठाकूर हे दिवाळी पहाट दिवाळी संध्या सारखे कार्यक्रम सातत्याने आयोजन करत आहेत. त्यानंतर वसई तालुका आणि पालघर मध्ये अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊ लागले. यंग स्टार्स ट्रस्ट विरार अध्यक्ष मा.आ. हितेंद्र ठाकूर आयोजित व ज्येष्ठ नागरिक संघ विरार, अखिल भारतीय निवृत्त रेल कर्मचारी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर दीपावली हा भरगच्च गाण्यांचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष डॉ. वर्तक सर्व पदाधिकारी, रेल कर्मचारी संघाचे फाटक तसेच विवा ठाकूर चारिटेबल ट्रस्टचे सदस्य संजीव पाटील मा. नगरसेवक विलासबंधू चोरघे, हार्दिक राऊत, सुरेखा कुरकुरे, नयन जैन, अनेक नगरसेवक नगरसेविका उपस्थित होते. या निमित्ताने सामाजिक कार्य करणाऱ्या डॉ. वर्तक, प्रभाकर फाटक, प्रभाकर वर्तक, मिलिंद पोंक्षे या ज्येष्ठांचा सन्मान यावेळी करण्यात आला. या कार्यक्रमाची संकल्पना अजीव पाटील यांची होती. याप्रसंगी त्यांनी दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या व येणाऱ्या २५ तारखेला दिवाळी संध्या या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

# वसई दुर्ग दीपोत्सव उत्साहात साजरी; १०० मशाली व हजारो दिव्यांनी उजळला वसई किल्ला



**वसई : वार्ताहर**

फेथांध पोर्तुगीजांच्या जाचातून हतबल झालेल्या वसईकरांना मुक्त करण्यासाठी हिंदवी साम्राज्याचे २१००० मराठे हुतात्मा झाले. आपल्या घरी दिवाळी-दसरा साजरी व्हावा म्हणून त्यांनी बलिदान दिले. स्वतःच्या कुटुंबाचा व जीवाचा त्याग केला. दिवाळीत एकीकडे संपूर्ण वसई-विरार शहर, घरे, दुकाने, मंदिर, चर्च, मॉल्स, रस्ते प्रकाशमान होऊन झगमगत असतात तर दुसरीकडे पराक्रमी हिंदवी सैन्याच्या शौर्याचा व बलिदानाचा साक्षीदार असलेला वसईचा किल्ला (नागेश महातीर्थ) मात्र अंधारात असतो. पूर्वापार अनेक परिवार व धर्मसभा वसई किल्ल्यातील नागेश महातीर्थावर दीपावली साजरी करतात. आमची वसई सामाजिक समूह, धर्मसभा व वसई-विरार, नायगाव नालासोपारा च्या देश व धर्माभिमानी नागरिकांनी दिपोत्सवात हजारो पणत्या प्रज्वलित करून भव्य आकाश कंदिल उजळवला. १०० मशालींच्या दिमाखदार उजेडात, वाद्यांच्या गजरात व जय वज्राई-जय चिमाजीच्या जयघोषात अवघे वातावरण दुमदुमले होते. या प्रसंगी लीलाई चा २६व्या दिवाळी अंकाचे लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी लिलाईच्या संपादिका पूजा रोकडे, नवोदित अभिनेत्री साक्षी नाईक, धर्मसभेचे राष्ट्रीय अध्यक्ष वेदमूर्ती धनंजयशास्त्री वैद्य व अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार अनिलराज रोकडेजी यांनी युवक-युवतींना उत्तम मार्गदर्शन प्रदान केले. याप्रसंगी संपूर्ण कार्यक्रमाचे बारकाईने विशेष कव्हरेज 'वसई लाईव्ह'चे डिसोझा सर यांनी केले.

# मराठी नाट्य रसिक परिवार यंग स्टार्स ट्रस्ट आयोजित 'दिवाळी पहाट' कार्यक्रमाला वसईकरांची तुफान गर्दी




**वसई : वार्ताहर**

बहुजन विकास आघाडी, मराठी नाट्य रसिक परिवार यंग स्टार्स ट्रस्ट विरार अध्यक्ष हितेंद्र ठाकूर, वाय.एम.सी.ए. माणिकपूर विद्यमाने वसई पश्चिम येथील सभागृहात 'मराठी पाऊल पडते पुढे' या सुमधुर गाण्यांची 'दिवाळी पहाट' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. दिवाळी पहाट कार्यक्रमात माजी महापौर नारायण मानकर, माजी विरोधी पक्ष नेता विनायक निकम, स्थायी समितीचे माजी सभापती कवियित्री ज्योती बालिका, संदेश जाधव, वायएमसीएचे अध्यक्ष तथा माजी उपमहापौर प्रकाश रॉड्रिग्ज, वसई तालुका कला क्रीडा विभागाचे प्रकाश वनमाळी, साहित्यिक अशोक मुळे, माजी सभापती वृंदेश पाटील, वसई विकासिनी दृक कला महाविद्यालयाचे विश्वस्त सचिव विजय वर्तक, कोमसापचे वसई अध्यक्ष प्रकाश पाटील यांच्यासह मराठी नाट्य रसिक परिवार, माजी नगरसेवक, बविआ, यंग स्टार्स ट्रस्ट पदाधिकारी कार्यकर्ते, रसिक उपस्थित होते सभागृह पूर्णपणे भरले होते तर रसिकांनी बाहेर देखील गर्दी केली होती. मराठी पाऊल पुढले पुढे या कार्यक्रमात गायक श्रीरंग भावे, प्राजक्ता रानडे, धनश्री देशपांडे, विश्वजीत बोरवणकर यांनी गाणी सादर केली, तर सुसंवादीका म्हणून दीपाली केळकर यांनी गायक, गीतकार आदींची माहिती करून दिली व वादक प्रशांत लळीत, सागर साठे विजय तांबे दत्ता तावडे, सूर्यकांत सुर्वे, अनिल करंजवकर, अभिजित सावंत, बाबू शेट्ये यांची साथ मिळाली व उत्तरोत्तर कार्यक्रम बहरत गेला. कवियित्री ज्योती बालिका यांनी रचलेले गीत देखील गायिकेने गायले व रसिकांनी मोठ्या प्रमाणात दाद गाण्याला दाद दिली. कार्यक्रमाचा समारोप मराठी पाऊल पडते पुढे या गीताने करण्यात आला यावेळी उपस्थित नागरिकांनी गायकांना भरभरून दाद दिली उपस्थितांचे आभार प्रकाश वनमाळी यांनी मांडत असताना बविआ राजकारण करत नाही तर वसईतील रसिकांना अधिकाधिक आनंद घेता यावा यासाठी प्रयत्न करते, माजी आमदार हे विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणून नेहमीच प्रयत्नशील असतात म्हणून अनेक वर्ष वसई तालुका कला क्रीडा महोत्सव सुरु आहे असे सांगितले. वसई विरार शहर महापालिकेने मॅरेथॉन, शालेय कला क्रीडा महोत्सव रद्द केला दिवाळी पहाट कार्यक्रमात सहभाग नाही मात्र बहुजन विकास आघाडीने अविरतपणे रसिकाच्या आग्रहास्तव दिवाळी पहाट सुरु ठेवला आहे. त्यामुळे नागरिकांना मराठी गाण्यांचा आस्वाद दिवाळीच्या पहिल्या दिवशी घेता आला असे मत माजी विरोधी पक्ष नेता विनायक निकम यांनी मांडले आहे. वसईला साहित्याची संस्कृती लाभली आहे येथील रसिक हे दर्दी आहेत. त्यामुळे नगराध्यक्ष असताना दिवाळी पहाट कार्यक्रम सुरु केला व आजतायागत सुरूच आहे माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या संकल्पेतून अनेक कार्यक्रम यशस्वी झाले आहेत यंदा नागरिकांची गर्दी गतवर्षीपेक्षा अधिक दिसून आली त्यामुळे रसिक वर्ग वाढत आहे असे माजी महापौर नारायण मानकर यांनी सांगितले.



हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com




क्राईम संध्या
www.crimesandhya.com
लातूर/पालघर/सोलापूर
सोमवार दि. २७ ऑक्टोबर २०२५ ते रविवार दि. २ नोव्हेंबर २०२५



# जातीय दहशतवाद घडवू पाहणाऱ्या दिल्ली व ग्वाल्हेरच्या वकिलांवर कठोर कार्यवाही करा – संजयभाऊ कांबळे



**लातूर : वार्ताहर**

जातीय दहशतवाद आणि हिंसाचार घडवू पाहणाऱ्या नवी दिल्ली येथील राकेश किशोर आणि ग्वाल्हेरचे अ‍ॅड. अनिल मिश्रा यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी भारतीय दलित पँथरचे राज्य कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी एका निवेदनाद्वारे केंद्रीय गृहमंत्र्यांकडे केली आहे. संबंधित विधिज्ञांच्या निषेधार्थ भारतीय दलित पँथर या सामाजिक संघटनेच्या वतीने शुक्रवार, दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी संजयभाऊ कांबळे यांच्या नेतृत्वात लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडे केंद्रीय गृहमंत्र्यांचे निवेदन सुपूर्द करण्यात आले. या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश भूषणकुमार गवई हे दलित असल्याने न्यायालयाच्या दालनामध्ये कामकाज चालू असताना जातीय मानसिकतेतून अ‍ॅड.राकेश किशोर यांनी त्यांच्यावर पादत्राणे फेकून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. ही कृती अतिशय निंदनिय, लोकशाहीला काळिमा फासणारी, संविधानविरोधी आहे. त्या घटनेचा देशभरातून निषेध केला जात आहे. दिल्ली पाठोपाठ ग्वाल्हेर न्यायालयातही अ‍ॅड. अनिल मिश्रा यांनीही डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधाना विरोधात गरळ ओकण्याचे काम केले आहे. या दोन्ही घटना जातीय दहशतवाद व जातीय हिंसाचार घडवू पाहणाऱ्या असून त्याचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे देशात अशांतता पसरविण्याच्या कलमांखाली तसेच देशद्रोहाचे गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावे. भविष्यात अशा घटना घडणार नाहीत याचीही पुरेपूर दक्षता बाळगली जावी, अशी अपेक्षाही या निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनावर संजयभाऊ कांबळे यांच्यासह जिल्हाध्यक्ष धम्मानंद घोडके, जिल्हा महासचिव संग्राम कदम, जिल्हा मार्गदर्शक विश्वास कांबळे, सतीश वाघमारे, हरिश्चंद्र वाघमारे, रुपेश गायकवाड, सतीश मादळे, गोविंद गायकवाड, नारायण गायकवाड, महादेव गुळवे, सुनील सरवदे, धम्मपाल सावंत, नितीन कांबळे, अजय शृंगारे, महादेव बनसोडे, राजीव कांबळे, उत्तम कांबळे, दयानंद सोनकांबळे, सायस पाडुळे, संदीप तिगोटे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भिवंडीत अतिधोकादायक एक मजली इमारत अचानक कोसळली, सुदैवाने जीवितहानी नाही



**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडी पालिका क्षेत्रात शुक्रवारी रात्री ८.४५ वाजताच्या सुमारास प्रभाग समिती क्रमांक चार येथे तळ अधिक एक मजली लोड बेरिंग अतिधोकादायक ठरविलेली इमारत कोसळण्याची दुर्घटना घडली आहे. पालिका प्रशासनाने इमारत अती धोकादायक ठरविल्याने वरील मजल्यावर राहणारे कुटुंबीयांचे घर खाली केले होते. परंतु तळ मजल्यावर किराणा दुकान सुरू असल्याने दुर्घटना घडल्यानंतर स्थानिकांनी दुकान चालकास व एक ग्राहक अशा दोघांना सुरक्षित बाहेर काढले आहे. भिवंडी पालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्रमांक चार अंतर्गत मालमत्ता क्रमांक ७५७ आजमी नगर हाफिज नगर या तळ एक मजल्याच्या इमारतीच्या अंशतः भाग कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक भोईवाडा पोलिसांसह प्रभाग अधिकारी गिरीश गोष्टेकर व अग्निशमन विभागाचे अधिकारी नितीन चव्हाण तसेच आपत्कालीन विभागाचे साकिब खरबे पालिका पथकासह घटनास्थळी दाखल होत त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आहे.इमारती नजिकच्या घरातील कुटुंबियांना सुरक्षित स्थळी हटवून धोकादायक इमारतीचा भाग निष्कासित करण्याची कारवाई सुरू केली आहे. सुदैवाने या दुर्घटनेत जीवितहानी टळल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

# उद्योजक स्वप्निल अण्णा जाधव यांचा शिवसेनेत प्रवेश



**देवणी : वार्ताहर**

उदगीर येथील युवा नेते तथा उद्योजक स्वप्निल अण्णा जाधव यांनी आपल्या राजकीय प्रवासाला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात शिवसेना नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे आणि माजी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे चे जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी, आणि उपजिल्हाप्रमुख कैलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर येथील शिवसेना भवन येथे पक्षप्रवेश केला

याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, उपजिल्हाप्रमुख कैलास पाटील, जिल्हा समन्वयक प्रकाश हैबतपुरे, शिवसेना उदगीर तालुकाप्रमुख प्रशांत मोरे, शहर प्रमुख बालाजी सोनाळे, तालुका समन्वयक व्यंकट साबणे, शाखाप्रमुख परशुराम विभुते, तालुका सचिव अरुण बिरादार, माजी शहर प्रमुख मुन्ना पांचाळ, उपशाखाप्रमुख माधव शेल्हाळे, जळकोट प्रमुख सारंग आगलावे, शंकर धोंडापुरे तालुका संघटक, पांडुरंग परीट, राहुल शिवंगे, लक्समन श्रीमंगले, वैभव कदम, सदाशिव शिवपूजे, यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. युवा नेते तथा उद्योगपती स्वप्नील अण्णा जाधव यांच्यासोबत सुरज जाधव, हरिबा जाधव, नारायण जाधव, संतोष आदठराव, मारुती जाधव, अमर मोरे, अमोल जोंधळे, शिवानंद सोमवंशी, बालाजी भोसले, अंगद बिरादार, दीपक भोसले, सचिन डावळे यांच्यासह स्वप्निल अण्णा जाधव युवा मंचच्या सर्व शाखाप्रमुख आणि पदाधिकाऱ्यांनी जाहीर प्रवेश केला. स्वप्निल अण्णा जाधव यांच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केल्याने महाविकास आघाडीला नवचैतन्य प्राप्त होणार आहे. येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने स्वप्निल अण्णा जाधव यांचा हा प्रवेश अत्यंत महत्त्वाचा आणि महाविकास आघाडीला बळ देणारा ठरणार आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# दिवेअंजुर गावातील ग्रामस्थांसाठी विविध सुविधांचे लोकार्पण




**भिवंडी : वार्ताहर**

माजी केंद्रीय राज्यमंत्री माजी खासदार कपिल पाटील यांच्या प्रयत्नातून भिवंडी तालुक्यातील दिवे अंजुर गावातील ग्रामस्थां साठी विविध नागरी सुविधा पुरविणाऱ्या कामांचे माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते रविवारी (१९) रोजी लोकार्पण करण्यात आले.

याप्रसंगी मजूर संस्थेचे माजी अध्यक्ष सुधाकर म्हात्रे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य देवेश पाटील, माजी नगरसेवक सुमित पाटील, माजी सरपंच सिद्धेश पाटील, सरपंच वैजयंती नामदेव पाटील, आकाश म्हात्रे, उपसरपंच नंदलाल प्रकाश पाटील, तानाजी बाळाराम पाटील, रविंद्र एकनाथ पाटील, पंढरीनाथ बाळाराम पाटील, पंडित कुंडलिक म्हात्रे, आत्माराम सखाराम पाटील, शैलेंद्र म्हात्रे, हेमंत पाटील, पंढरीनाथ पाटील आदी उपस्थित होते. कपिल पाटील यांच्या प्रयत्नांतून विविध नागरी कामांसाठी सरकारी यंत्रणांकडे पाठपुरावा करण्यात आला होता. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर गावातील शंकर मंदिरात झालेल्या कार्यक्रमात सुविधांचे लोकार्पण करण्यात आले. या सुविधांमध्ये 'जल जीवन मिशन'अंतर्गत नवीन जलकुंभ, स्व.पुरुषोत्तम मोरेश्वर पाटील व्यायामशाळा, घनकचरा प्रकल्प, ओमशिव महिला मंडळ हॉल, ई-लायब्ररी, दोन बस थांबे, गावात प्रवेशासाठी दोन प्रवेशद्वार, तीन हायमास्टचे उद्घाटन, महिला भगिनींसाठी हॉल, अंगणवाडी केंद्र, बंदरावरील स्मशानभूमीचे नुतनीकरण, धापरावरील स्मशानभूमीचे सुशोभीकरण,जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी टीव्ही व वह्यावाटप, क्रिकेट मैदान आदींचे लोकार्पण करण्यात आले. माझी राजकीय कारकीर्द ज्या गावच्या सरपंच पदापासून सुरू झाली त्या गावातील ग्रामस्थांना आणखी सुविधा व गावाच्या विकासा साठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही देत, गावातील नागरिकांना आवश्यक सुविधा पुरविण्यासाठी ग्रामपंचायत सरपंचांसह पदाधिकाऱ्यांनी कार्य करावे, अशी सूचना कपिल पाटील यांनी केली. तर या कामांसाठी केलेल्या सहकार्याबद्दल सरपंच वैजयंती नामदेव पाटील यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

# उल्हासनगरमध्ये अपुरा व अनियमित पाणी पुरवठ्यामुळे जनतेत प्रचंड नाराजी



**उल्हासनगर : वार्ताहर**

उल्हासनगरमध्ये पॅनल क्रमांक १९ वीर तानाजी नगर व पॉनल क्रमांक १८ समतागार २ मधील नागरिकांनी नोंदवला उल्हासनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाचा निषेध. पॅनल क्रमांक १९ वीर तानाजी नगर उल्हासनगर ५, तसेच उल्हासनगर ५ पॉनल १८ मध्ये समतानगर २ येथे सुद्धा पुरेसे पाणी मिळत नसल्याने प्रशासन विरोधात नाराजी व्यक्त केली. समतानगर मध्ये रात्र-बेरात्र, अनियमित व अपुरा पाणी पुर्वठा केल्या जातो. महिला वर्गना पाण्यासाठी रात्रभर जागरण करावे लागत आहे. रात्रभर जागरण करून सुद्धा पाणी पुरेसे मिळत नाही. या जागरणामुळे महिलांना आजारपणाला आमंत्रण द्यावे लागत आहे. या वस्तीमध्ये अनेक वर्षापासून पिण्याच्या पाण्याची समस्या आहे लोकांना पिण्यापुरते ही पाणी उपलब्ध होत नाही त्यामुळे महिला वर्गाना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. याविषयी सतत पाठपुरावा करून मोर्चा आंदोलने करून देखील उल्हासनगर महानगरपालिका प्रशासन,पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करत आहेत. नागरिक उल्हासनगर मनपा प्रशासन बद्दूल प्रचंड नाराजी व्यक्त करीत आहे.या सर्व प्रकाराच्या मनस्ताप होऊन आज दिवाळीच्या सणाला उल्हासनगर महानगरपालिका प्रशासन पाणीपुरवठा विभाग यांच्या निषेधार्थ प्रत्येक दारापुढे खाली हांडे कळशी ठेवून व दारात काळी रांगोळी काढून निषेध नोंदवला आहे. आता तरी पाण्याच्या संमसेचे निवारण होणार का? असा प्रश्न जनतेला पडला आहे.

# आदिवासी आश्रम शाळेतील रोजंदारी कर्मचाऱ्यांचे बिऱ्हाड मोर्चा; राजभवन दिशेने भिवंडीतून मार्गस्थ!

**भिवंडी : वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी आश्रम शाळेमध्ये रोजंदारीवर असलेल्या कामगारांचे खाजगीकरण करत असल्याच्या कारणाने, आणि शासनाच्या वतीने वारंवार आश्वासने देऊन त्याची पूर्तता न झाल्याच्या निषेधार्थ, रोजंदारी कर्मचारी संघटना आणि सकल आदिवासी समाजाच्या वतीने नाशिक येथे चालू असलेले ११० दिवसाचे आंदोलन कायम ठेवून काही निवडक आंदोलक डोक्यावरील टोपलीत हजारोंच्या संख्येने ग्रामपंचायतीनचे ठराव घेऊन, आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांची मूर्ती डोक्यावर घेत,आदिवासी आश्रमशाळेतील १७९१ शिक्षकांची बाह्यस्रोता द्वारे भरण्याचे आदेश तत्काळ रद्द करावेत,मागील शैक्षणिक क्षेत्रातील कार्यरत वर्ग तीन, वर्ग चार



कर्मचाऱ्यांना रोजंदारी तासिका तत्त्वावर तात्काळ शाळेच्या पहिल्या दिवसा पासून आदेशित करून हजर करण्यात यावे. वर्ग चार कर्मचाऱ्यांच्या मृत संवर्गातील पदे तात्काळ जीवित करणे व १६ नोव्हेंबर २०२२ च्या सुधारित आकृतीबंध रद्द करावा अशा मागण्या घेऊन ही आंदोलक पायी बिऱ्हाड मोर्चा मुंबईच्या राजभवनाच्या दिशेने निघाले आहेत. हा मोर्चा शुक्रवारी भिवंडी तालुक्यातून मार्गस्थ झाला. १४ ऑक्टोबर पासून निघालेले आंदोलक २७ ऑक्टोंबर रोजी राजभवनावर धडकणार असून आम्ही आमच्या मागण्यांसाठी राज्य सरकारकडे वेळोवेळी मागणी करून ही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने आमचा भ्रमनिरास झाला आहे. त्यामुळे राज्य शासनाचे प्रमुख म्हणून राज्यपाल यांच्याकडे न्याय मागण्यासाठी आम्ही बिऱ्हाड मोर्चासह निघालो आहोत अशी माहिती अध्यक्ष ललित कुमार चौधरी यांनी दिली आहे. यावेळी मागण्या मान्य न झाल्यास आत्मदहनाचा इशारा आंदोलकांच्या वतीने देण्यात आला आहे.

# अंबरनाथ निवडणूकीच्या तोंडावर राजकीय वातावरणात गर्मा-गरमी



**अंबरनाथ : सुनिल तांबे**

अंबरनाथ मधील माझी नगरसेवक सुरेंद्र यादव यांनी भाजपामध्ये प्रवेश केलाय. नंतर शिवसेनेचे आमदार डॉ.बालाजी किणीकर यांनी मित्रपक्षाला थेट इशारा दिला आहे. तुम्ही युती धर्म पाडत नसाल तर आमच्या कडे सुद्धा आजी-माजी नगरसेवक व पदाधिकारी यांची यादी आहे. असे किणिकर म्हणाले याक्षणवर-रियाक्षण देऊ शकतो असा मित्रपक्षाला इशारा दिला. माजी नगरसेवक सुरेंद्र यादव २०१५ साली काँग्रेस तिकिटावर नगरसेवक म्हणून निवडून आले होते. लोकसभेच्या निवडूकेपूर्वी शिवसेनेत प्रवेश केला होता. आता अंबरनाथ नगरपरिषद निवडणूक तोंडावर आल्या असता सुरेंद्र यादव यांनी भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हान यांच्या उपस्थितीत भाजपा मध्ये प्रवेश केलाय. मात्र यावरून अंबरनाथ नगरपरिषद निवडणुका तोंडावर आल्याअस्ता अंबरनाथ मध्ये राजकीय घडामोडी दिसून येत आहे. मात्र यावरून अंबरनाथ मध्ये वातावरण तापल्याचे दिसत आहे. आमदार डॉ.बालाजी किणिकर म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यात युती वेळी मित्र पक्ष्यातील माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते यांना युतीधर्म पाडत एकमेकांच्या पक्षात प्रवेश द्यायचा नाही असे ठरले होते. पुढे आमदार म्हणाले की आमच्याकडे पण युतीमधील माजी नगरसेवक पदाधिकारी पक्ष प्रवेश्यासाठी आले होते. पण मात्र आम्ही युतीधर्म पडला, आणि मित्र पक्ष प्रवेश करून घेत असेल तर आणि अशेच होत असेल तर आमच्या कडे सुद्धा पक्षप्रवेश करणाऱ्यांची लिस्ट आहे. आम्ही सुद्धा याक्षण वर रियाक्षण घेऊ शकतो, असा थेट मित्र पक्षाला इशारा दिला आहे.

## थोडक्यात वृत्तांत



### 'सागरलाटा' दिवाळी अंकाचे प्रकाशित

विरार : दरवर्षी प्रमाणे यंदाही वाचकांना 'सागरलाटा' दिवाळी अंकातून विविध विषयांवरील साहित्य, लेख आणि कविता यांचा आस्वाद घेता येणार आहे. गेल्या २३ वर्षांपासून विरार येथून सागरलाटा दिवाळी अंक प्रकाशित केला जात आहे. महाराष्ट्रात दिवाळी अंकांची मोठी परंपरा असून दिवाळीच्या काळात वाचकांना विविध विषयांवरील साहित्याचा आस्वाद घेता यावा म्हणून आम्ही सातत्याने दिवाळी अंक प्रकशित करीत आहोत, असे सागरलाटा दिवाळी अंकाचे संपादक आजीव पाटील यांनी सांगितले. तसेच दिवाळी अंकाच्या माध्यमातून आम्ही अनेक नवोदित लेखक आणि कवींना व्यासपीठ उपलब्ध करून देत असतो, असेही त्यांनी सांगितले. यंदाही वाचकांना विविध विषयांवरील लेखांची साहित्यिक मेजवानी सागरलाटा दिवाळी अंकाच्या माध्यमातून घेता येणार आहे. या अंकात इब्राहिम अफगाण, शिवाजी धुरी, स्वाती वैद्य, प्रा. नारायण गिरप, प्रवीण दामले, आजीव पाटील यांचे या दिवाळी अंकात लेख आहेत. ठाणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष काशिनाथ पाटील ह्यांच्या हस्ते आज बुधवार २२ ऑक्टोबर रोजी विरार येथे सागरलाटा दिवाळी अंकाचे प्रकाशन झाले.

### कोकण विभागीय लोकशाही दिनी ४ अर्ज प्राप्त

नवी मुंबई :कोंकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) श्रीमती फरोग मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली. यावेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या ६ असून आज आलेल्या अर्जांची संख्या ४ आहे, असे एकूण प्राप्त अर्ज १० होते. त्यापैकी १ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. आता कोंकण विभागीय स्तरावर १ अर्ज प्रलंबित आहेत.

### लातूर जिल्हा कुटुंब कल्याण आणि लसीकरणात राज्यात दुसऱ्या क्रमांकावर

लातूर : आरोग्य व्यवस्थापन व माहिती पद्धतीअंतर्गत कुटुंब कल्याण, माता-बाल संगोपन व लसीकरण कार्यक्रमात लातूर जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी साध्य केली असून, ऑगस्ट २०२५ अखेरच्या राज्यस्तरीय जिल्हानिहाय अहवालानुसार लातूर जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. पुणे येथील राज्य कुटुंब कल्याण कार्यालयाचे अतिरिक्त संचालक यांनी तयार केलेल्या या अहवालात एकूण गरोदर माता नोंदणी, १२ आठवड्यापूर्वी नोंदणी, गरोदर मतांचे लसीकरण, आयएफए १८० गोळ्या वितरण, प्रसुतीपूर्व चार तपासण्या, अति जोखमीच्या व रक्तक्षयग्रस्त मातांचे उपचार, एकूण प्रसूती, बालक नोंदणी, कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण, झिरो डोसपासून गोवर-रुबेला पर्यंतचे प्राथमिक लसीकरण व संपूर्ण सुरक्षित बालक यासारख्या आरोग्य निर्देशकांचा विचार करून ही रँकिंग ठरविण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. नितीन बोडके, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुनिल भागवत व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कामगिरी केली आहे. तसेच, जिल्हा सनियंत्रण मूल्यमापन अधिकारी मंगेश रणदिवे व त्यांच्या टीमने अहवाल सादरीकरण केले आहे.

### सावी दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन नगरचतुर्दशीच्या शुभमुहूर्तावर संपन्न



वसई : साहित्य, समाज आणि संस्कृतीचा संगम असलेल्या सावी दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन नरक चतुर्दशीच्या शुभमुहूर्तावर उत्साहात पार पडले. या सोहळ्याचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्त्या तथा 'सविता इन्वेस्टमेंट'च्या संस्थापिका सौ. सविता जावखेडकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या वेळी कवियत्री, लेखिका तथा उद्योजिका भारती पवार, उद्योजिका आम्रपाली साळवे, संपादक रमाकांत घुमटेकर, सहसंपादक आनंद गदगी, 'कोकण संवाद'चे संपादक राजेश राऊत, कवियत्री कविता जाधव आणि कु. युवराज महेंद्र घुमटेकर उपस्थित होते. या वर्षीच्या अंकात विविध विषयांवरील लेखनाचा समृद्ध असा आविष्कार वाचकांना अनुभवायला मिळणार आहे. 'ऑपरेशन सिंदूर', 'कृत्रिम बुद्धिमत्ता – वरदान की शाप?', 'बळीराजा सुखी केव्हा होणार?', 'दिव्यांच्या प्रकाशात सावधगिरीचा दिवा...', 'कोळीवाडा : काळाच्या ओघात हरवलेली परंपरा', तसेच 'भारतीय चित्रपटसृष्टीचा शोमॅन' यांसारख्या लेखांबरोबरच साहित्य, आरोग्य, संस्कृती आणि समाजजीवन यांचा सुंदर संगम या अंकात साकारला आहे. 'कवितेच्या जगात', 'बालचित्रांची दिवाळी' आणि 'व्यक्तिविशेष' हे विशेष विभाग या अंकाचे आकर्षण अधिक वाढवतात. नरक चतुर्दशीच्या या मंगल क्षणी प्रकाशित झालेला 'सावी' विशेषांक वसईच्या साहित्यविश्वाला नवचैतन्य देणारा ठरला आहे.

27 OCTOBER TO 02 NOVEMER 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 10/25/2025 7:39 PM Page 1






# किल्ले वसई मोहीम परिवार अंतर्गत वसई किल्ल्यावर दीपोत्सव मानवंदना उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद

**वसई : वार्ताहर**

२१ ऑक्टोबर २०२५ मंगळवार लक्ष्मीपूजन रोजी किल्ले वसई मोहीम परिवार व अनाम प्रेम परिवार अंतर्गत जंजिरे वसई किल्ल्यावर दीपोत्सव मानवंदना उपक्रम आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमात दीपोत्सव, वास्तुदेवता पूजन, इतिहास मार्गदर्शन, नरवीर चिमणाजी आप्पा व श्री आई वज्रेश्वरी देवी प्रतिमा पूजन, नाणी पत्रक इत्यादी उपक्रम संपन्न झाले. किल्ले वसई मोहिम परिवाराचे प्रमुख इतिहास अभ्यासक व प्रमुख श्रीदत्त राऊत दुर्गमित्रांना मराठेकालीन जंजिरे वसई रोषणाई स्थळे या नव्या संशोधनाबद्दल पुराव्यानिशी माहिती दिली. जंजिरे वसई किल्ल्यातील श्री वज्रेश्वरी देवी मंदिराच्या समोरील पोर्तुगीजकालीन नगरपालिका स्थळी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत पूजन संपन्न झाले. किल्ले वसई मोहीम परिवार अंतर्गत उपक्रमांचे यंदाचे २३वे वर्ष साजरे होत आहे. आजच्या उपक्रमाचे औचित्य साधून अनाम प्रेम परिवाराची कु अशीधरा पाटील हिने सितार वादनात भूपाळी राग अर्पण करून ज्ञात अज्ञात वीरांना मानवंदना दिली. यावेळी अनाम प्रेम परिवार विरार अंतर्गत विजय पाटील, नूतन पाटील, विष्णु प्रभू, विपीन ठाकूर यांनी दिवाळी फराळाचे वाटप केले. सन २००३ सालापासून किल्ले वसई मोहीम परिवार अंतर्गत दीपावलीत होणारी मशाल मानवंदना व इतिहास मार्गदर्शन उपक्रम स्थानिक व दुर्गमित्रांच्या उत्सुकतेचा विषय असून दरवर्षीप्रमाणे ज्ञात अज्ञात वीरांना मानवंदना देण्यात आली. दुर्गमित्र निखिल हडळ, जीवन पाटील यांनी कार्यक्रम नियोजनात सहकार्य केले. उपक्रमाच्या समारोपात सर्व उपस्थित दुर्गमित्रांनी ऐतिहासिक नाणी प्रदर्शनास किल्ल्याबाहेर भेट दिली. आजच्या उपक्रमात वसईतील स्थानिक नागरिक, पर्यटक यांची उपस्थिती होती. किल्ले वसई मोहिमेचे प्रमुख व इतिहास अभ्यासक श्रीदत्त राऊत यांच्या मते जंजिरे वसई किल्ल्यावर दरवर्षी होणारी दीपोत्सव मशाल मानवंदना नवे संशोधन सादर करत असते. इतिहास संशोधन, मार्गदर्शन अशा दोन्ही माध्यमातून एक ठाम जबाबदारी सातत्याने पूर्ण करत आहेत.





## पान १ वरून....

### संशयामुळे कंटाळली होती मानसिक ...

उघड्यावर आलं आहे. नकुल आणि चैताली यांच्यात पहाटे वाद झाले. यातूनच प्रकृतीने भारदस्त असलेल्या चैतालीने कापडाने नकुलचा गळा आवळून हत्या केली. दोन आणि पाच वर्षांची मुलं आतील रूममध्ये झोपली होती, तेव्हा हा सर्व थरार बाहेरच्या रूममध्ये सुरू होता. ही घटना समोर आल्यानंतर चैतालीला चिंचवड पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. नकुल आणि चैताली यांचा साडी सेंटरचा व्यवसाय होता. असं असताना नेहमीच्या वादातून आणि सतत चारित्र्यावर संशय घेतल्याने पत्नीने पतीची हत्या केली आहे. घटनेचा अधिक तपास चिंचवड पोलिस घेत आहेत. पहाटे पावणे तीनच्या सुमारास ही घटना घडली आहे. पत्नीने पतीचा कापडाने गळा आवळून हत्या केली. चिंचवड पोलिसांनी चैताली भोईरला ताब्यात घेतले आहे. अधिक तपास सुरू आह, असे पोलिस निरीक्षक गोसावी यांनी सांगिले.

### दोघींचा खून करुन ‘सिरीयल किलर’...

असे तिघे रहात होते. लफडेबाज अनिल संदानशिव याची ओळख एके दिवशी नजिकच्या एरंडोल तालुक्यातील माहेरवाशीन असलेल्या वैजंताबाई भोई या महिलेसोबत झाली. विवाहानंतर वैजंताबाई सुरत येथे सासरी गेली. वैजंताबाई अधुनमधून माहेरी येत होती. त्यावेळी तिची अनिल संदानशिव याच्यासोबत भेट होत असे. दोघांमधे एकमेकांच्या सहमतीने शरीरसंबंध प्रस्थापित होत असत. शरीरसुखासहजोडीला मिळणारे पैसे या दुहेरी हेतूने ती अनिलच्या संपर्कात आली होती. एके दिवशी अनिलने तिला सुरत येथून गावी येण्यास सांगितले. त्या दृष्टीने तिने नियोजन सुरु केले. घरात कुणाला काही न सांगता ४ मे २०२५ रोजी ती बसने सुरत येथून धुळे येथे येण्यास निघाली. प्रवासादरम्यान तिचा अनिलसोबत मोबाईलवरसंपर्क सुरु होता. ठरल्यानुसार ५ मे २०२५ रोजीभल्या पहाटेपासून अनिल तिची धुळे बस स्थानकावर वाट बघत होता. पहाटे अडीच वाजेच्या दरम्यान ती धुळे बस स्थानकावर उतरली. धुळे बस स्थानकात आल्यानंतर तिने पहिला फोन अनिल यास लावला. मी धुळे बस स्थानकात आली असून तुम्ही कुठे आहात? असे तिने त्याला विचारले. तिचा फोन येताच जवळपास असलेला अनिल तिच्या जवळ गेला. त्यानंतर जवळच असलेल्या बाकावर दोघे बसले. पहाटे चार वाजेपर्यंत दोघांनी एकमेकांसोबत गुलुगुलू गप्पा केल्या. या कालावधीत अनिलची पारखी नजर तिच्या अंगावरील दागिन्यांवर खिळून होती. तिच्या अंगावरील दागिने त्याला खुणवत होते. तिच्या अंगावरील दागिने हस्तगत करणे हेच त्याचे मुख्य उद्दीष्ट होते. तत्पुर्वी तिच्यासोबत शरीरसुखाचा आनंद लुटण्याचे त्याचेनियोजन होते. पहाटे चार वाजता धुळे बस स्थानकात चोपडा या गावी जाणाऱ्या बसची उद्घोषणा झाली. या बसने वाटेत जानवे या गावी उतरुन परिसरातील जंगलात समागम करण्यासाठी जाण्याचे दोघांचे नियोजन होते. त्यामुळे दोघे जण जानवे येथे जाण्यासाठी चोपडा जाणाऱ्या बसमधे बसले. मात्र ती जलद बस होती. त्यामुळे ही बस लहान गावांना थांबणार नाही हे वाहकाने प्रवाशांना अगोदरच बजावले. बस वाहकासोबत चर्चा करुन अनिलने अमळनेरचे तिकीट काढून जानवे या गावी बस उभी करण्याची विनंती केली. त्यानुसार पहाटे पाच वाजेच्या सुमारास दोघे जण जानवे या गावानजीक उतरले. पहाट होण्यापुर्वी अंधारातच दोघे पायी चालत चालत जानवे जंगलातील झाडाझुडूपात गुपचूप गेले. त्याठिकाणी उतावीळ झालेल्या दोघांनी एकमेकांच्या मर्जीने शरीरसुखाचा आनंद लुटला. शरीरसुखाचा मनसोक्त आनंद लुटल्यानंतर अनिलच्या अंगातील हैवान जागा झाला. वैजंताबाईच्या अंगावरील दागिने काढून घेण्यासाठी त्याने जवळच पडलेला लाकडी दांडका तिच्या डोक्यात हाणला. जखमी होत तडफडत तिने आपले प्राण सोडले. शरीरसुखाच्या आशेने आलेली वैजंताबाई प्राणघातक हल्ल्यात ठार झाली. नियतीने लिहून ठेवलेल्या मृत्युच्या जागेवर ती स्वत:हून सुरत ते धुळे आणि धुळे ते जानवे असा बसने प्रवास करुन पायी पायी जानवे येथील जंगलात आली होती. वैजंताबाई मरण पावल्याची खात्री झाल्यानंतर अनिलने तिच्या कानातील सोन्याच्या बाळ्या काढून घेतल्या. याशिवाय तिच्याजवळ असलेल्या पिशवीतील रोख तिस हजार रुपये देखील काढून घेतले. रोख रक्कम आणि सोन्याच्या बाळ्या असा ऐवज घेत त्याने तेथून धुम ठोकली. अमळनेर येथील एका सराफाला त्या सोन्याच्या बाळ्या त्याने चाळीस हजार रुपयांना विक्री केल्या. अशाप्रकारे सत्तर हजार रुपयांची रोकड त्याच्या हाती आली.

या घटनेनंतर महिलांच्या अंगावरील दागिने लुटणे, त्यांच्याकडून गोड बोलून पैसे उधार घेणे, त्यांच्याकडुन शरीरसुख घेण्याची अनिलची हाव वाढतच गेली. जंगल परिसरात एकांतात महिलांचे दागिने लुटल्यानंतर त्यांच्या खूनाच्या घटनेचा कुणाला थांगपत्ता लागत नाही, या घटनेचे कुणी साक्षीदार नसतात, महिला आपल्याला प्रतिकार करु शकत नाही आणि आपण कधी पकडले जाणार नहीं असा त्याचा समज झाला. त्याचे धाडस देखील वाढले. त्यानंतर काही दिवस निघून गेले. दरम्यानच्या कालावधीत सुरत येथून कुणाला काही न सांगता घराबाहेर पडलेल्या वैजंताबाईचा शोध तिचे नातेवाईक घेत होते. बरीच वाट बघून आणि शोध घेऊनही ती घरी परत आली नाही. त्यामुळे तिचा मुलगा गणेश भोई याने सुरत येथील चौक बाजार पोलिस स्टेशनला ती बेपत्ता झाल्याबाबत तक्रार दिली. त्या तक्रारीच्या आधारे १७ मे २०२५ रोजी चौक बाजार पोलिस स्टेशनला वैजंताबाई बेपत्ताझाल्याप्रकरणी मिसींग दाखल करण्यात आली. या मिसींगचा तपास सुरत येथील चौक बाजार पोलिस करत होते. वैजंताबाईचा मृतदेह जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यातील जंगल परिसरात निर्मनुष्य जागी पडून होता. त्याकडेबरेच दिवस कुणाचे लक्ष गेले नाही. दरम्यानच्या कालावधीत आपला खून पचला अशा अविर्भावात उजळ माथ्याने अनिल संदानशिव वावरत होता. त्याचे धाडस अजूनच वाढले. अनिल संदानशिव याची अमळनेर शहरात भिक्षा मागणारी ओळखीची एक महिला होती. शहनाजबी इकबाल शेख असे त्या चाळीस वर्ष वयाच्या भिक्षेकरी महिलेचे नाव होते. अमळनेर शहरात भिक्षा मागून ती स्वत:चा उदरनिर्वाह करत होती. ती भिक्षा मागणारी महिला असली तरी तिने सत्तर हजार रुपयेगाठीशी जमा केले होते. दुर्भाग्याची गोष्ट म्हणजे तिने ते सत्तर हजार रुपये अनिल संदानशिव याला उधार दिले होते. गोड बोलून घेतलेले सत्तर हहार तो तिला देत नव्हता. तिला तिचे पैसे देण्यास अनिल टाळाटाळ करत वेळ मारुन नेत होता. उधार दिलेले सत्तर हजार रुपये परत मिळण्यासाठी तीचा अनिलकडे तगादा सुरु होता. तिच्या तगाद्यापासून सुटका करण्यासाठी त्याने त्याचा नेहमीचा फॉर्म्युला वापरण्याचे मनाशी ठरवले. तिचे पैसे परत देण्याच्या बहाण्याने तिला जंगलात समागमासाठी घेऊन जायचेआणि तेथेच तिचा खून करायचा असेत्याने मनाशी निश्चित केले. त्याने गोड बोलून तिला म्हटले की मी तुला तुझे पैसे परत देतो, तु माझ्यासोबत जंगलात चल. आपल्याला आपले पैसे परत मिळतील या आशेने ती त्याच्यासोबत जंगलात जाण्यास तयार झाली. १९ जून २०२५ रोजी भर दुपारी तो तिला मोटार सायकलवर बसवून पैसे देण्याच्या बहाण्याने लांब जंगलात नेत होता. त्याचवेळी त्याच्या एका परिचिताने दोघांना मोटार सायकलवर डबलसिट जातांना पाहिले. अनिल संदानशिव याला तो इसम चांगल्याप्रकारे ओळखत होता. त्याला त्याची सवय माहिती होती. अनिल संदानशिव हा शहनाजबी सोबत कोणते सुख घेण्यासाठी जात आहे हे त्या इसमाने ओळखले. त्यामुळे त्याने लागलीच अनिल संदानशिव यास त्याच्या मोबाईलवर कॉल केला. मोबाईलवर कॉल आल्यामुळे अनिल संदानशिव याने भरधाव वेगातील मोटार सायकलवर उभी केली. पलीकडून बोलणाऱ्या त्या परिचिताने त्याला विचारले की तु कुठे आहेस? आणी तुझ्यासोबत कोण आहे? त्यावर अनिल संदानशिव याने त्याला उत्तर दिले की माझ्यासोबत शहनाजबी असून मी पिंपळकोठा रस्त्यापासून जंगलाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कोपऱ्यावर उभा आहे. त्यावर पलीकडून बोलणाऱ्या त्या परिचिताने त्याला म्हटले की तु जेथे आहे तेथे थांब मी देखील तुमच्यासोबत येतो. त्यामुळे अनिल संदानशिव हा त्या परिचिताची वाट बघत शहनाजबी हिच्यासोबत थांबला. काही वेळातच तो परिचीत त्याठिकाणी मोटारसायकलने आला. तेथून तिघे जण जंगलात गेले. त्याठिकाणी त्या परिचिताने शहनाजबी हिला बाजूला नेऊन तिला खासगीत काहीतरी सांगितले. दोघांचे बोलणे झाल्यानंतर शहनाजबी तेथून अनिल संदानशिव याच्याकडे आली. ती त्याला तिच्या सत्तर हजार रुपयांची मागणी करु लागली. तु जर मला माझे सत्तर हजार रुपये दिले नाही तर मी तुझ्याविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल करेन असे ती त्याला म्हणू लागली. तिचे बोलणे ऐकून अनिल संदानशिव याच्या रागाचा पारा चढला. त्याने जवळच असलेला लाकडी दांडका उचलून शहनाजबी हिच्या डोक्यात मारला. त्यात ती मोठ्या प्रमाणात जखमी झाली. तिच्या डोक्यातून रक्त येऊ लागले. अनिल संदानशिव संतापल्याचे बघून ती जखमी अवस्थेत आपला जीव मुठीत धरुन सैरावैरा पळत सुटली. तिच्याप्रमाणेच अनिलच्या ओळखीचा जंगलात आलेला तो परिचीत देखील घाबरला. तो पळून जात असलेल्या शहनाजबी हिला मोटार सायकलवर बसवून निघून गेला. त्यानंतर काही दिवस शहनाजबी हिने दवाखान्यात वैद्यकीय उपचार घेतले. २७ जून रोजी तिला दवाखान्यातून सुटी मिळाली. त्यानंतर तिने तिच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याप्रकरणी अनिल संदानशिव याच्याविरुद्ध अमळनेर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल केला. गु.र.नं. २६१/२०२५, बी.एन.एस. कलम १०९ (१), ३५१ (३) अन्वये ३ जुलै २०२५ रोजी हा गुन्हा नोंद करण्यात आला. जखमी शहनाजबी वैद्यकीय उपचारानंतर बरी झाली. तिचे दैव बलवत्तर होते म्हणून ती अनिलच्या तावडीतून बचावली आणि जीवंत राहिली. सत्तर हजार रुपये परत मिळण्याच्या आशेने ती अनिल सोबत जात होती. ज्याप्रमाणे अनिल याने शहनाजबी हिच्याकडून सत्तर हजार रुपये उधार घेतले होते. त्याप्रमाणे त्याने पारोळा तालुक्यातील उंदीरखेडा येथील शोभाबाई रघुनाथ कोळी या महिलेकडून तिस हजार रुपये उधार घेतले होते. शोभाबाई ही महिला पारोळा शहरात विविध ठिकाणी झाडू पोछा करुन आपला उदरनिर्वाह करत होती. ती देखील अनिल संदानशिव याला तिस हजार रुपये उधार देऊन फसली होती. ती तिचे तिस हजार रुपये घेण्यासाठी अनिलकडे तगादा लावत होती. तिच्यापासून सुटका करुन घेण्यासह तिच्या अंगावरील दागिने गायब करण्यासाठी तिचा खून करण्याचे त्याने नियोजन केले. सुरतच्या वैजंताबाईचा त्याने केलेला पहिला खून अजून उघड झाला नव्हता. अमळनेरच्या शहनाजबी हिचा दुसरा खून होण्यापुर्वी ती जखमी अवस्थेत पळून जाण्यात यशस्वी झाली. त्यामुळे ती बचावली. आता पारोळा येथील शोभाबाई हिचा खून करुन तिच्या अंगावरील दागिने ओरबाडण्याचा त्याचा विचार होता. असे केल्यामुळे तिच्या तगाद्यापासून आपली सुटका होईल असे त्याला वाटत होते. शहनाजबी हिला जखमी केल्यानंतर सहा दिवसांनी २४ जून २०२५ रोजी अनिल याने शोभाबाई सोबत संपर्क साधला. तो तिच्याशी गोड बोलू लागला. तिचे तिस हजार रुपये परत देण्याचे आमिष दाखवत गोड बोलून तो तिला मोटार सायकलने पारोळा तालुक्यातील सुमठाणे शिवार परिसरातील जंगलातघेउन गेला. सुमठाणे शिवारातील जंगलात दोघांनी आनंद घेतल्यानंतर त्याने तिच्या डोक्यात दगड घालून तिला मोठ्या प्रमाणात जखमी केले. दगडाच्या घावात शोभाबाई जखमी झाली. ती रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर कोसळली. शोभाबाई मरण पावल्याची खात्री झाल्यानंतर त्याने तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेतले. तिचा चेहरा प्लॅस्टीकच्या गोणीने बांधून त्याने दागिन्यांसह तेथून पलायन केले. ते दागिने त्याने अमळनेर येथील एका सराफाला नव्वद हजार रुपयात विक्री केले. अमळनेर तालुक्यातील जंगलात वैजंताबाईच्या खूनाप्रमाणेच पारोळा तालुक्यातील जंगलात शोभाबाईच्या खूनाचा गुन्हा देखील पचणार असे त्याला वाटत होते. अमळनेर तालुक्यातील जानवे शिवारातील वैजंताबाईच्या खूनाला जवळपास एक महिना झाला तरी त्याचा कुणाला थांगपत्ता लागला नाही. तिचा मृतदेह तसाच पडून होता. त्यामुळे तो कुजत होता. एक महिन्याच्या कालावधीनंतर अनिल संदानशिव याने पारोळा तालुक्यातील जंगलात शोभाबाईचा दुसरा खून केला. मात्र या खूनाची लगेच दुसऱ्या दिवशी वाच्यता झाली. २५ जून २०२५ रोजी सुमठाणे शिवारातील वन विभागाच्या जंगलात काही गुराख्यांना शोभाबाईचा मृतदेह आढळून आला. त्यांच्या दृष्टीने तो मृतदेह अनोळखी महिलेचा होता. मृतदेहाची दुर्गंधी परिसरात पसरली होती. त्या गुराख्यांनी या मृतदेहाची खबर सुमठाणे गावचे पोलिस पाटील वालजी पाटील यांना दिली. पोलिस पाटील वालजी पाटील यांनी याबाबत बहादरपूर बिट अंमलदार अशोक सातपुते यांना कळवले. या घटनेची माहिती पारोळा पोलिस स्टेशनचे तत्कालीन पोलिस निरीक्षक सचिन सानप यांच्यापर्यत आली. त्यांनी या घटनेची माहिती डिवायएसपी विनायक कोते यांच्या कानावर टाकली. अशा प्रकारे या मृतदेहाच्या माहितीमुळे पुढील तपासाची सुत्रे गतीमान झाली. या घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक सचिन सानप यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पथक घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी वन विभागाच्या निर्मनुष्य जागी जाईपर्यत बरीच रात्र झाली. वाटेत पोलिस पाटील यांना सोबत घेण्यात आले. घटनास्थळी जंगलातील झाडाझुडूपात शोभाबाईचा मृतदेह पडलेला होता. पोलिसांच्या दृष्टीने अनोळखी महिलेचा तो मृतदेह साधारण ३५ ते ४० वयोगटातील होता. सहायक पोलिस निरीक्षक योगेश महाजन यांनी घटनास्थळी फॉरेन्सीक पथकाला बोलावून घेतले. मयत अनोळखी महिलेचा चेहरा प्लॅस्टिकच्या पोत्याने झाकलेला होता. ते पोते दूर सारताच परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरण्यास सुरुवात झाली. या घटनेप्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी होत अंमलदार अशोक सातपुते यांनी पारोळा पोलिस स्टेशनला २६ जुन रोजी अज्ञात मारेकऱ्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल केला. हा गुन्हा भाग ५ गु.र.नं. १५४/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१), २३८ प्रमाणे दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पुढे सरकण्यासाठी सर्वप्रथम मयत महिलेची ओळख पटवणे गरजेचे होते. त्या दृष्टीने तपासाला सुरुवात करण्यात आली. जळगावसह धुळे आणि इतर जिल्ह्यातील पोलिस स्टेशनला मयत महिलेच्या वर्णनाशी मिळत्या जुळत्या महिलेची मिसींग दाखल आहे का याचा शोध घेण्यात आला. मात्र कुठेही तशा स्वरुपाची नोंद नसल्याचे आढळून आले. त्यामुळे महिलेची ओळख पटवण्याचे एक आव्हान पोलिसांसमोर होते. त्यामुळे पोलिसांनी आपले कसब वापरण्यासह गुप्त बातमीदार कामाला लावले. मयत महिलेच्या पायात असलेली धातुची रिंग कोणत्या समाजातील महिला त्यांच्या प्रथेनुसार वापरतात याचा शोध घेऊन ओळख पटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. याशिवाय विविध व्हॉटस ॲप गृपच्या माध्यमातून मयत महिलेसह तिच्या अंगावरील कपडे, तिच्या हातावरील गोंदण, कानातील रिंग आदींची माहिती प्रसारीत करुन ओळख पटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. याशिवाय मयत महिलेच्या हातातील हिरव्या काचेच्या बांगड्या व नारंगी पिवळा धागा बघता ती घटनेपुर्वी कोणत्या तरी मंदीरात दर्शनासाठी जावून आली असावी असा अंदाज व्यक्त करण्यात आला. तिच्या हातातील बांगड्या आणि धागा कोणत्या मंदीर परिसरात विक्री होतो त्याची देखील ओळख पटवण्याकामी माहीती घेण्यात आली. याशिवाय परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची मदत घेण्यात आली. तसेच घटनास्थळ परिसरातील मोबाईलचा डमडाटा संकलीत करण्यात आला. मात्र महिलेची ओळख पटत नव्हती. सर्व बाजूने महिलेची ओळख पटवण्याचा प्रयत्न सुरु असतांना पारोळा तालुक्यातील उंदीरखेडे या गावी राहणारी शोभाबाई रघुनाथ कोळी ही ४८ वर्ष वयोगटातील महिला बेपत्ता झाल्याची कुणकुण पारोळा पोलिसांना लागली. या गाव परिसरातील गावक-यांमधे देखील हीच चर्चा सुरु होती. हाच धागा पकडून पुढील तपासाला दिशा देण्यात आली. घटना उघडकीस आल्यानंतर तिन दिवसांनी २८ जुन रोजी दोन इसम पोलिस स्टेशनला आले. त्यातील गोपाल रघुनाथ कोळी या उंदीरखेडा येथील तरुणाने पोलिस निरीक्षक सचिन सानप यांना सांगितले की मी तुमची शोध पत्रिका वाचली असून त्यातील नमुद महिलेचे वर्णन माझ्या बेपत्ता आईच्या वर्णनासोबत मिळतेजुळते आहे. माझी आई शोभाबाई रघुनाथ कोळी ही पारोळा शहरात विविध ठिकाणी घरकाम, धुणी भांडी, झाडू पोछा करण्यासाठी जाते. मी गेल्या काही दिवसांपासून वैद्यकीय उपचारासाठी गुजरात राज्यात गेला होता. तेथून घरी परत आल्यावर मला माझी आई शोभाबाई बेपत्ता असल्याची माहिती मिळाली. आपण प्रसारीत केलेल्या शोध पत्रीकेतील महिलेचा फोटो आणि मृतदेह मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. त्याच्या म्हणण्यानुसार त्याला मयत महिलेचा फोटो आणि मृतदेह दाखवला असता त्याने तो ओळखला. मयत महिला ही त्याची आई शोभाबाई रघुनाथ कोळी हिच होती. अशा प्रकारे मयत महिलेची ओळख पटली आणि तपासाचा निम्मा भार कमी झाला. मात्र असे असले तरी तिची हत्या कुणी केली? कशासाठी केली? हा महत्वाचा शोध घेण्याचे काम आता सुरु झाले. मयत महिला शोभाबाई वापरत असलेल्या मोबाईल क्रमांकाचा डाटा स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने संकलीत करण्यात आला. तिच्या मोबाईलचे सर्वाधिक कॉल सुमठाणे गावातीलच संशयीत अनिल गोविंदा संदानशिव या तरुणासोबत झाले असल्याची माहिती तपासात पुढे आली. त्यामुळे संशयाची सुई आता अनिल संदानशिव या तरुणावर स्थिर झाली. स्थानिक गुन्हे शाखा आणि पारोळा पोलिस स्टेशन असे संयुक्त तपास पथक अनिल संदानशिव याचा शोध घेण्याकामी सुमठाणे गावात गेले. मात्र तो गावातून फरार झाला होता. त्यामुळे त्याच्यावरील पोलिसांचा संशय अजूनच बळावला. त्यामुळे पारोळा पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अनिल संदानशिव याच्या मागावर रवाना झाले होते. दरम्यानच्या कालावधीत अनिल संदानशिव याने आपल्यावर प्राणघातक हल्ला केला असल्याची तक्रार अमळनेर येथील भिक्षा मागणाऱ्या शहनाजबी इकबाल शेख या महिलेने अमळनेर पोलिस स्टेशनला केली. आपण अनिल संदानशिव यास उधार दिलेले सत्तर हजार रुपये मागितले असता त्याने आपल्याला जंगलात नेऊन प्राणघातक हल्ला केल्याचे तिने तक्रारीत नमुद केले. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार अमळनेर पोलिस स्टेशनला अनिल संदानशिव याच्याविरुद्ध खूनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामुळे अमळनेर पोलिस स्टेशनचे गुन्हे शोध पथक देखील फरार अनिल संदानशिव याच्या मागावर होते. २८ जून २०२५ च्या मध्यरात्री धुळे तालुक्याच्या जापी-शिताणे गावाच्या रस्त्यावर अनिल संदानशिव यास पोलिस पथकाने ताब्यात घेत पारोळा पोलिस स्टेशनला आणले. पोलिस कोठडीदरम्यान त्याने शोभाबाईचा खून केल्याची कबुली पारोळा पोलिस स्टेशनचे तत्कालीन पोलिस निरीक्षक सचिन सानप यांना दिली. अनिल संदानशिव पारोळा पोलिसांच्या तावडीत येण्याच्या सहा दिवसांपुर्वी २३ जुलै २०२५ रोजी अमळनेर तालुक्यातील जानवे या गावचे पोलिस पाटील विलास धोंडू पाटील यांनी अमळनेर पोलिस स्टेशनला एका अनोळखी महिलेच्या मृतदेहाची माहिती दिली. जानवे शिवारातील जंगलात एका अनोळखी महिलेचा मृतदेह पडलेला असून त्याची दुर्गंधी परिसरात पसरली असल्याची त्यांनी माहिती दिली. खुप दिवसापासून मृतदेह पडलेला होता. त्यामुळे मृतदेह कुजण्यास सुरुवात झाली होती. अमळनेर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी आपल्या सहका-यांच्या मदतीने घटनास्थळ गाठत पुढील कारवाई सुरु केली. सुरुवातीला याप्रकरणी ५९/२०२५ या क्रमांकाने अकस्मात मृत्युची नोंद घेण्यात आली.डीवायएसपी विनायक कोते यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरु करण्यात आला. घटनास्थळावर पोलिस पथकाला एक आधार कार्ड मिळून आले. ते आधार कार्ड वैजंताबाई भगवान भोई या नावाने जारी करण्यात आले होते. त्यावर वैजंताबाई या महिलेची जन्म तारिख, सुरत येथील पत्ता, मोबाईल क्रमांक आदी तपशील होता. सुरत येथील कतरगाम दरवाजा कुबेरनगर असा त्यावर पत्ता होता. मृतदेहाचे लांब केस, जवळच पडलेली पर्स, कपाळावरील टिकली आदी वस्तूंचे निरीक्षण केले असता तो मृतदेह महिलेचा असल्याचे स्पष्ट झाले होते. मृतदेहाजवळ आढळून आलेल्या आधारकार्डच्या मदतीने अधिक तपास केला असता ती महिला अर्थात वैजंताबाई ही सुरत येथून कुणाला काही न सांगता ४ मे २०२५ रोजी घरातून निघाली होती. तिच्या बेपत्ता झाल्याप्रकरणी सुरत येथील चौक बाजार पोलिस स्टेशनला गणेश भोई याने दिलेल्या तक्रारीनुसार मिसींग दाखल करण्यात आली होती. त्या मिसींगचा तक्रारदार गणेश भोई आणित्याची बहिण सोनल भोई या दोघांना बोलावून मृतदेहाचा फोटो, घटनास्थळावरील कपडे आणि इतर वस्तु दाखवण्यात आल्या. त्या वस्तू बघून तो मृतदेह आपली आई वैजंताबाई हिचा असल्याचे त्याने स्पष्ट केले. अशा प्रकारे मृतदेहाची ओळख स्पष्ट झाली. आता तिचा खून कुणी व का केला याचा तपास सुरु करण्यात आला. अमळनेर पोलिस स्टेशन हद्दीत वैजंताबाई भोई या महिलेची झालेली हत्या, पारोळा पोलिस स्टेशन हद्दीत शोभाबाई या महिलेची झालेली हत्या आणि अमळनेर शहरातील भिक्षेकरी महिलेवरील प्राणघातक हल्ला या तिघा घटनांमधे एक साम्य असल्याचे अमळनेर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या पारखी नजरेने हेरले. या तिन्ही घटना जंगल परिसरात एकांतात झाल्या होत्या. त्यामुळे पारोळा पोलिसांच्या ताब्यात असलेला अनिल गोविंदा संदानशिव हाच या घटनेतील गुन्हेगार असू शकतो हे त्यांना जाणवू लागले. त्यांनी त्याचा मोबाईल सिडीआर मागवला. त्यात त्यांना तथ्य आढळून आले. अमळनेर आणि पारोळा येथील महिलांच्या खूनाच्या दोन्ही घटनेत गुन्हा करण्यासाठी वापरलेल्यापध्दतीत साम्य आढळून आले. दोन्ही गुन्ह्यांचे घटनास्थळ हे एक किलोमीटरपेक्षाही कमी अंतराचे होते. दोन्ही घटनास्थळावरील मोबाईल टॉवर लोकेशनमधे अनिल गोविंदा संदानशिव याची उपस्थिती होती. दोघा मयत महिलांच्या मोबाईल क्रमांकावर अनिल संदानशिव याचे घटनेच्या दिवशी व अगोदर बोलणे झाल्याचे देखील स्पष्ट झाले. सखोल तपासाअंती वैजंताबाई भोई हिच्या खून प्रकरणी अमळनेर पोलिस स्टेशनचे पोलिस उप निरीक्षक समाधान रामकृष्ण गायकवाड यांनी संशयीत आरोपी अनिल संदानशिव याच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल केला. गु.र.न. ३०४/२०२५ बी.एन.एस. कलम १०३ (१) नुसार हा गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हेगारकितीही हुशार असला तरी तो कोणता तरी पुरावा मागे ठेवत असतो. केवळ दागिने आणी पैशासाठी खून करुन घटनास्थळावरुन पलायन करणाऱ्या अनिलने वैजंताबाईच्या आधारकार्डाचा पुरावा मागे ठेवला आणि तो पोलिसांच्या हाती आला. याशिवाय मोबाईल लोकेशन आणि कॉल रेकॉर्ड या तांत्रीक तपासात देखील तो अडकला. या गुन्ह्याचा पुढील तपास अमळनेर उप विभागीय अधिकारी विनायक कोते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम व त्यांचे सहकारी पोलिस उप निरीक्षक समाधान गायकवाड, नामदेव बोरकर, हे.कॉ. संतोष नागरे, हे.कॉ. काशीनाथ पाटील, पो.कॉ. सागर साळुंखे आदी करत आहेत. या तपासकामी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उप निरीक्षक शरद बागल व हे.कॉ. कैलास शिंदे यांचे सहकार्य लाभले.

27 OCTOBER TO 02 NOVEMER 2025 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 10/25/2025 7:39 PM Page 1



# डॉ.आंबेडकर यांच्या वारसांच्या जमिनीवरील बेकायदा इमारतीत आठ जणांची एक कोटी रुपयांची फसवणूक



**डोंबिवली : वार्ताहर**

डोंबिवलीतील दावडी गावातील सेंट जॉन शाळेसमोरील पाटीदार भवन लगतच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वारसांच्या नावे असलेल्या जमिनीवर कब्जेदार आणि दोन भूमाफियांनी आठ माळ्याची नऊ वर्षाच्या कालावधीत तनिष्का रेसिडेन्सी नावाने एक बेकायदा इमारत उभारली. या इमारतीत डोंबिवली, २७ गाव परिसरातील एका शिक्षिकेसह सात जणांनी नऊ ते २० लाखापर्यंत रकमा भरणा करून घर, गाळ्यांसाठी भूमाफियांकडे एक कोटी २१ लाख रूपये भरणा केले. नऊ वर्षाच्या कालावधीत या बेकायदा इमारतीत घर, गाळा नाहीच, पण आपले पैसेही परत न मिळाल्याने फसवणूक झालेल्या एका शिक्षिकेच्या तक्रारीवरून मानपाडा पोलिसांनी तीन भूमाफियांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. डॉ. आंबेडकर यांच्या वारसांची ही जमीन असल्याने या जमिनीवरील भूमाफियांची इमारत कल्याण डोंबिवली पालिकेने जमीनदोस्त करावी आणि या जमिनीचा ताबा डॉ. आंबेडकरांच्या वारसांना देण्याची मागणी रिपब्लिकन सेनेचे कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष आनंद नवसागरे यांनी पालिका आयुक्तांकडे केली होती. या तक्रारीवरून पालिकेच्या आय प्रभागाचे तत्कालीन साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी ही आठ माळ्याची बेकायदा इमारत पाच महिन्यापूर्वी भुईसपाट केली. या इमारतीला पालिकेच्या बांधकाम परवानग्या आहेत, अशी खोटी माहिती देऊन भूमाफियांनी घर खरेदीदारांकडून घर नोंदणीच्या आगाऊ रकमा स्वीकारल्या होत्या. तनिष्का रेसिडेन्सी या बेकायदा इमारतीत शिक्षिका सरिता पांडे (रा. दावडी), सुधा तिवारी, शिवआसरे प्रजापती (रा.गोवंडी), बरसा यादव (रा. सोनारपाडा), विकास यादव (रा. चक्कीनाका), अशोककुमार प्रजापती, लालबहादूर यादव, अब्दुल गनी खान (सर्व रा. दावडी) या घर खरेदीदारांची फसवणूक झाली आहे. सरिता पांडे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी जमीन कब्जेदार तुळशीराम काळण, अनमोल डेव्हलपर्सचे मोहिनीराज निवृत्ती पाखले, ललित महाजन या भूमाफियांविरूध्द मानपाडा पोलीस ठाण्यात १ कोटी २१ लाख ५१ हजार रूपये फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार शिक्षिका सरिता पांडे यांनी पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, २०१७ मध्ये मी डोंबिवली जवळील दावडी येथील सेंट जॉन शाळेसमोरील पाटीदार भवनजवळच्या तनिष्का रेसिडेन्सी इमारतीत १० लाख २५ हजाराला एक गाळा मोहिनीराज पाखले या विकासकाकडून खरेदी केला होता. या गाळ्याचे ७ लाख रूपये पाखले यांच्याकडे भरणा केले. पाखले यांनी या इमारतीचा व्यवहार आपण प्रकाश नायक यांना हस्तांतरित केला आहे, असे पांडे यांना सांगितले. हा व्यवहार पुन्हा नायक यांनी पाखले आणि ललित महाजन यांना हस्तांतरित केला. पाखले यांनी इमारतीचे बहुततांशी बांधकाम पूर्ण केले होते. गाळ्यासाठी सरिता पांडे यांनी ५० ते ९० हजार रूपये या भूमाफियांकडे जमा केले. सरिता यांना बँकेतून कर्ज काढून देण्यासाठी पाखले, महाजन यांनी सरिता यांच्याकडून कर्जासाठीची आवश्यक कागदपत्रे घेतली. त्यानंतर कर्ज नाहीच, पण गाळ्याचा ताबा मिळत नसल्याने सरिता यांनी पैसे परत करण्याची मागणी केली. पाखले, महाजन यांनी सरिता यांना पैसे देण्यासाठी उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरूवात केली. आपल्यासह इतर सात जणांची अशाचप्रकारे मूळ करारनामा करणारे तुळशीराम काळण, ललित महाजन आणि मोहिनीराज पाखले यांनी घर, गाळा खरेदीसाठी पैसे घेऊन त्यांना गाळा, पैसे परत न करता त्यांची फसवणूक केली म्हणून सरिता पांडे यांनी पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

# ऑनलाइन फसवणूकीतील दोघांचे ६ लाख रुपये परत करण्यात सायबर पोलिसांना यश

**मिरा-भाईंदर : वार्ताहर**

काशीमिरा परिसरात राहणाऱ्या एका इसमाची फेक शेअर ट्रेडिंग ॲपमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून ५ लाख ६१ हजारांची फसवणूक करण्यात आली होती. तसेच भाईंदर पूर्वेला राहणाऱ्या इसमाची अश्लिल फोटो प्रसारित करण्याची धमकी देवून ४१५५० रुपयांची फसवणूक करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांनी तपास करून दोघांचेही ६ लाख २ हजार ५५० रूपये सायबर पोलिसांनी परत मिळवून दिले आहेत. मिरा भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीत राहणारे तक्रारदार जयधनर यांनी एका शेअर ट्रेडिंग ॲपमध्ये गुंतवणूक करुन नफा मिळत असल्याबाबत जाहिरात पाहिली. त्यानंतर तक्रारदारांनी सदर ॲपमध्ये मोठ्या रक्कमेची गुंतवणूक केली. परंतु, त्यांना कोणताही परतावा मिळाला नाही. त्यानंतर त्यांनी आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार अर्ज सादर केला. तक्रारदार यांची ऑनलाईन एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रार नोंदवून फसवणुकीची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये थांबवण्यात आली. तसेच फसवणुकीच्या व्यवहाराच्या अनुषंगाने अधिक तपास करुन तक्रारदार यांची रक्कम वर्ग झालेल्या बँक खात्यांची माहिती प्राप्त करुन संशयित १२ बँक खात्यांना वारंवार पत्रव्यवहार करुन ६ बँक खात्यात रक्कम थांबवण्यात आली. सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणूक झालेली रक्कम ५,६१,००० रूपये त्यांच्या मूळ खात्यात परत मिळवून दिले आहेत. दुसर्या तक्रारीत भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाणेचे हद्दीत राहणार्या मुकेश चौधरी यांना अनोळखी महिलेने व्हॉटसअप व्हिडीओ कॉल करुन मैत्री करावयाची असल्याचे सांगितले. त्यानंतर अनोळखी महिलेने तक्रारदार यांच्याशी अश्लिल संभाषण करुन नग्न होण्यास सांगितले.

तक्रारदार यांनी महिलेने सांगितल्याप्रमाणे केले असता सदर व्हिडीओ रेकॉर्ड करुन महिलेने तक्रारदार यांच्याकडे पैशांची मागणी केली. पैसे न दिल्यास सदरचा व्हिडीओ व अश्लील फोटो तक्रारदार यांच्या संपर्कातील लोकांना तसेच सोशल मिडीयावर प्रसारीत करण्याची धमकी दिली. तक्रारदार यांनी बदनामीच्या भितीने महिलेस रक्कम वर्ग केली. तक्रारदार यांनी पडताळणी केली असता त्यांची आर्थिक फसवणूक झाल्याचा तक्रार अर्ज सायबर पोलीस ठाणे येथे दिला होता. फसवणुकीची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये थांबवण्यात आली. वेगवेगळ्या बँक खात्यांमधील रक्कम परत मिळवण्यासाठी न्यायालयामध्ये अर्ज सादर केला. सायबर पोलीस ठाणे यांनी न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व न्यायालयाचे आदेश प्राप्त केले. अशाप्रकारे सायबर पोलीस ठाण्याने सातत्याने २ वर्षे ६ महीने पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणूक झालेली ४१,५५० रुपये त्यांच्या मूळ खात्यात परत मिळवून दिली आहे.

# जव्हार येथे ‘काठ्या-द मॅसेंजर’ मराठी लघुपटाचा प्रीमियर शो उत्साहात संपन्न



**वाडा : वार्ताहर**

आदिवासी संस्कृतीचा गौरव सांगणारा आणि मुळातून माणूसपणाचा अर्थ शोधणारा लघुपट, आदिवासी समाजातील दिग्गज कलाकारांनी साकारलेल्या काठ्या - द मॅसेंजर’ या मराठी लघुपटाचा प्रीमियर शो जव्हार येथे मोठ्या उत्साहात पार पडला. समाजजीवनातील वास्तव आणि संदेशप्रधान आशय असलेल्या या लघुपटाचे सादरीकरण स्थानिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत करण्यात आले. हा चित्रपट युट्युब वर पाहायला मिळणार आहे. कार्यक्रमास उपस्थित प्रमुख पाहुणे व कलाकारांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत आणि सन्मान करण्यात आला. लघुपटातील अभिनय, दिग्दर्शन व सामाजिक विषयावरील मांडणीला उपस्थितांनी भरभरून दाद दिली. या प्रसंगी चित्रपटाचे दिग्दर्शक, कलाकार तसेच आदिवासी समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक मोर्या ग्रुपच्या कार्यकर्त्यांच्या सहकार्याने करण्यात आले. लेखक-दिग्दर्शक संतोष बांबरे सिनेमॅटोग्राफर युवराज आशान, रुपेश आशान तसेच यशवंत तेलम, संजना चौधरी, अनिल चातुर्य, उषा राथड, सुभाष लाड, दिनेश भोईर, विजय भोरे, एकनाथ वाघ, विजय बाराथे, संजय बुधर, हेमा राऊत, एकनाथ झुगरे, संजना बुधर, शांताराम पिलाना, ऋतिक गोविंद, धाकल बांबरे, धवळी राऊत, माई रावते, डॉ. दिपक चौधरी, विनायक चौधरी आदी कलाकारांनी काम केले आहे. काठ्या-द मेसेंजर हा आदिवासी संस्कृतीवर आधारित एक हृदयस्पर्शी माहितीपट असून याची निर्मिती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार यांनी केली आहे.

## देवणी येथे सोमवारी ’मिनी एक्सपो’ आणि भव्य सत्कार सोहळा कार्यक्रम

**देवणी : वार्ताहर**

देवणी येथे येत्या सोमवारी २७ ऑक्टोबर रोजी ऑल टेन्ट.डीलर्स वेल्फेअर आरोग्यनायझेशन महाराष्ट्र देवणी तालुका मंडप असोशियन तर्फे लातूर जिल्हास्तरीय देवणी मिनी एक्सपो व भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी येथील उद्योजक मल्लिकार्जुन मानकरी हे राहणार आहेत तर उद्घाटक म्हणून असोसिएशनचे चेअरमन ऑल इंडिया तथा महाराष्ट्र अध्यक्ष रामकिशन दडूशेठ पुरोहित हे राहणार आहेत याप्रसंगी येथील मठाधीश श्री सिद्धलिंग शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सानिध्यात हा कार्यक्रम होत आहे. प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार सोमनाथ वाडकर, विजयसिंह परदेशी महाराष्ट्र प्रदेश प्रभारी, सागर भाई प्रल्हाद चव्हाण चेअरमन महाराष्ट्र कोल्हापूर व कृष्णात अक्कनगिरे जिल्हा अध्यक्ष लातूर मंडप असोसिएशन सहा.पोलीस निरीक्षक भीमराव गायकवाड आणि नगराध्यक्ष डॉक्टर कीर्तीताई संजय घोरपडे तसेच माजी नगराध्यक्ष वैजनाथ अश्टुरे यांची उपस्थिती राहणार आहे. काशिनाथ गोणे रेनापुर अध्यक्ष विश्वनाथ पुणे औसा अध्यक्ष सिद्धेश्वर सुरवशे निलंगा अध्यक्ष दिलीप मिनियार हे उपस्थित राहणार आहेत.

# ‘कातकरी समाजाच्या कोवळ्या मुलींची विक्री’ हा समाजच नष्ट होण्याच्या मार्गावर - विवेक पंडित




**पालघर : वार्ताहर**

कौटिल्य मल्टिक्रिएशन,बोधगया प्रोडक्शन यांच्या वतीने आणि डिंपल पब्लिकेशनच्या सहकार्याने दिवाळीच्या पूर्वसंध्येला साहित्याचा बौद्धिक फराळ म्हणजे ‘शब्दांची रत्ने’ हा कार्यक्रम यशवंत नाट्यमंदिराचे जयश्री व जयंत साळगांवकर सभागृह माटुंगा पश्चिम, मुंबई येथे पार पडला. डिंपल पब्लिकेशनतर्फे समाजवादी विचारसरणीचे संवेदनशील लेखक, श्रमजीवी संघटनेचे संस्थापक विवेकभाऊ पंडित यांच्या माणूस म्हणून जगण्यासाठी या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन रंगकर्मी, निर्माता, दिग्दर्शक अशोक हांडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी ॲड.राजेंद्र पै, डॉ.महेश केळुसकर, अशोक मुळे, मनोज चौधरी, कुणाल रेगे, डॉ.पल्लवी बनसोडे उपस्थित होते. ॲड. राजेंद्र पै यांनी विवेकभाऊंच्या कामाचा आढावा घेत आचार्य अत्रेंच्या आठवणी सांगून सानेगुरुजींचा संघर्ष अधोरेखित करत प्रेषकांना खिळवून ठेवले.तर अशोक हांडेंनी आपल्या छडड मधील आठवणी सांगून आपल्या आयुष्याचा nss विद्यार्थीकाळ हा आदिवासी भागात केलेल्या कामाचा उल्लेख करत विवेकभाऊंच्या कार्याचा आढावा आपल्या ओघवत्या शैलीत घेत गाण्यातून त्यांनी लोकसंस्कृतीचे दर्शन घडवले. तसेच वसईतून प्रसिद्ध होणाऱ्या ‘अधोरेखित’ मैत्र विशेषांकाचे प्रकाशन अशोक हांडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. अधोरेखितच्या संपादीका डॉ.पल्लवी बनसोडे यांनी अंकाविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. डॉ.महेश केळुसकर यांनी विवेकभाऊ पंडित यांची खुमारसदार मुलाखत घेत प्रेक्षकांना खिळवून ठेवले. विवेकभाऊंच्या प्रत्यक्ष लढ्याचे,संघर्षाचे प्रसंग ऐकताना प्रत्येकजण अंतर्मुख होत होता. स्वातंत्र्यानंतरही एक दिनदुबळा समाज अजूनही गुलामीत आयुष्य व्यथित करतोय, कातकरी समाजातील कोवळ्या मुलींची विक्री होते, अशाने तो समाजच नष्ट होण्याच्या मार्गावर आहे,मुलींचे प्रमाण घटत जाईल ही भिती व्यक्त करताना विवेकभाऊ अधिक भावूक झाले आणि शासन आणि समाजव्यवस्थेपुढे आपण काहीच करु शकत नाही. ही हतबलता, खंत त्यांनी व्यक्त केली.एकंदरीतच समाजाभिमुख, संवेदनशील अशा विचारांनी अस्वस्थ करणाऱ्या मनोवस्थेत आणून ही मुलाखत खऱ्या अर्थाने बौद्धिक फराळ देऊन गेली. बोधगया प्रोडक्शनचे सुसंवादक कुणाल रेगे यांच्या संकल्पनेतून साकारलेला ‘शब्दांचीच रत्ने’ हा कार्यक्रम वाचन प्रेरणा जागवणारा ठरला.

# बंदी असलेल्या गुटख्याची वाहतुक करणारा ट्रक जप्त; एक इसम ताब्यात

**वाडा : वार्ताहर**

वाडा शहरातील खंडेश्वरी नाका येथे रात्रीच्या सुमारास गस्तीवर असले ल्या पोलीस कर्मचारी यांना मिळालेल्या गुप्त माहीतीवरून मनोर-वाडा-भिवंडी रोडवरुन एका ट्रक मधुन महाराष्ट्र राज्यात विक्री व वाहतुकीस बंदी असलेल्या गुटखा या मालाची वाहतुक होणार आहे. अशी खात्रीशिर माहीती मिळाल्याने. वाडा पोलीसांनी खंडेश्वरीनाका येथे नाकाबंदी करुन मनोर बाजुकडुन येणारा मोटार ट्रक (एम.एच.११ ए.एल. १४२८) थांबवुन सदर ट्रकचा चालक मोहम्मद नसीरुद्दीन जमालुद्दीन अन्सारी (३७) याला खाली उतरवुन त्याच्याकडे ट्रकमध्ये असलेल्या मालाबाबत विचारपुस केली असता त्याने ट्रकमध्ये गुटखा हा माल असल्याचे सांगीतले. सदरच्या ट्रकची पंचांसमक्ष तपासणी केली असता त्या ट्रकमध्ये पांढरे रंगाच्या ४० गोण्या आढळून आल्या. त्याप्रत्येक पाउचमध्ये लहान आकाराच्या पुडया असल्याचे आढळुन आले. सदरचे पुडीला उग्र सुगंधी असा वास येत आहे. सफेद रंगाच्या एका गोणीची किंमत ४५ हजार रुपये अश्या एकुण ४० मोठ्या गोण्या त्यामध्ये गुटखा हा माल एकुण किंमत १८ लाख रुपयांचा गुटखाट्रक असा एकुण ३३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असुन मोटार ट्रक चालक मोहम्मद नसीरुद्दीन जमालुद्दीन अन्सारी याचे विरुध्द वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असुन अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक राजकुमार मुंढे हे करत आहेत. सदरची कारवाई यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर, विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, एस.एस.महेर, उप विभागीय पोलीस अधिकारी जव्हार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली दत्तात्रय किंद्रे, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित साबळे, उपनिरीक्षक हरी जाधव, राजकुमार मुंढे, सहाय्यक फौजदार गुरुनाथ गोतारणे यांनी केली आहे.

# वसई-विरार महापालिकेच्या कचऱ्याच्या डब्यात फोडले फटाके

वसई : वसईत दोन तरुण महापालिकेच्या कचऱ्याच्या डब्यात फटाके फोडत असल्याचे दिसत आहे. तर सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करणाऱ्या तरुणांच्या कृतीबद्दल नागरिकांमधून संताप व्यक्त केला आहे. दिवाळीच्या अगदी पहिल्याच दिवसापासून वसई विरार शहरात सुतळीबॉम्ब, लवंगी, रॉकेट असे विविध प्रकारचे आणि मोठ्या आवाजाचे फटाके फोडून आतषबाजी केली जात आहे. अशातच वसई पश्चिमेतील रेल्वे स्थानक परिसरातून एक व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओत दोन तरुण फटाके फोडताना दिसत आहेत. तर त्यातलाच एक तरुण रस्त्याच्याशेजारी असणाऱ्या पालिकेच्या कचऱ्याच्या डब्यात पेटता सुतळीबॉम्ब टाकून फोडला जात आहे. बॉम्बच्या तिव्रते कचऱ्याच्या डब्याचे झाकण फुटून गेले आहे. तरुणांनी केलेल्या या प्रकारचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाला आहे. तसेच रेल्वे स्थानक परिसर आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणी पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी आता नागरिकांकडून केली जात आहे. आधीच शहरात पालिकेच्या कचरा कुंड्यांची दयनीय अवस्था आहे त्यातच अशा प्रकारे साहित्याची नासधूस करणे हे अत्यंत चुकीचे असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे.

# वसई विरार महानगरपालिकेच्या नगररचना उपसंचालक पदी मनिष भिष्णूरकरांची नियुक्ती



**विरार : वार्ताहर**

मागील पाच महिन्यांपासून वसई विरार पालिकेतील नगररचना उपसंचालक पद रिक्त होते. अखेर सोमवारी राज्याच्या नगररचना विकास विभागाने आदेश जारी करत मनिष भिष्णूरकर यांची नगररचना उपसंचालक पदी नियुक्ती केली आहे. मे महिन्यात तत्कालीन नगररचना उपसंचालक वाय. एस. रेड्डी यांच्यावर बांधकाम घोटाळ्या प्रकरणी सक्तवसुली संचनालयाने (ईडी) कारवाई केली होती. या कारवाईनंतर महापालिकेने ही त्यांचे सेवेतून निलंबन केले होते. तेव्हा पासून पालिकेतील नगररचना उपसंचालक पद रिक्त होते. त्यामुळे पालिकेतील बांधकाम परवानग्या यासह इतर प्रमुख कामे रखडली होती. नगररचना विभागासाठी नवीन अधिकारी नियुक्त करण्यासाठी महापालिकेचे आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी शासनस्तरावर पत्रव्यवहार केला होता. अखेर पाच महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर राज्याच्या नगरविकास विभागाने वसई विरार महापालिकेच्या नगरचना उपसंचालक पदी मनिष भिष्णूरकर यांची नियुक्ती केली आहे. २० ऑक्टोबर रोजी तसे आदेश शासनाच्या नगररचना विभागाचे सहसचिव सुबराव शिंदे यांनी काढले आहे. नवनियुक्त झालेले भिष्णूरकर हे यापूर्वी सोलापूर महापालिकेत कार्यरत होते. ईडीच्या कारवाई नंतर नगररचना विभागातील कामकाज थंडावले होते. वसई-विरार महापालिका नगररचना विभागात अधिकारीच उपलब्ध नसल्याने नव्याने मंजुरीसाठी आलेल्या शेकडो फाईल्सवर निर्णय होत नव्हते तर दुसरीकडे महापालिकेत विकास आराखडा मंजुरी, भोगवटा प्रमाणपत्र, बांधकाम परवानगी अशी कामेही रखडली होती. आता नगररचना विभागात नवीन अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्याने नागरिकांची रखडलेली कामे मार्गी लागतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**
**निविदा सूचना क्रमांक ५७ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी, पालघर-बोईसर रोड, पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून मागवित आहेत. खालील कामांकरीता ‘बी-१’ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०१ (एक) काम समाविष्ट आहेत.

टिप : या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
1) www.pwd.maharashtra.gov.in 2) http://mahatenders.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये लक्ष (रुपये) जी.एस.टी.वगळून | अंदाजित रक्कम रुपये लक्ष (अक्षरी) जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | चिंचणी वाणगाव आशागड हळदपाडा उधवा कोदाड रस्ता रा.मा. ७५ कि.मी. ३४/५०० ते ५०/००० ची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. ता. डहाणू, जि.पालघर | रु. ७५५१४६४/- | अक्षरी रु.पंचाहत्तर लक्ष एकावन्न हजार चारशे चौसष्ट मात्र | वार्षिक देखभाल दुरुस्ती सन २०२५-२०२६ (AMC) |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

वरिल कामाची निविदा उपलब्ध कालावधी - दि. २४/१०/२०२५ ते दि. ३१/१०/२०२५ पर्यंत
निविदा उघडणे - दि. ०३/११/२०२५ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर.

जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/८६४९
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) - ४०१ ४०४.
दिनांक : १७/१०/२०२५

सही/-
(म. पां. किणी)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

विमाका/कोवि/२०२५-२०२६/१५७

27 OCTOBER TO 02 NOVEMER 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 10/25/2025 7:40 PM Page 1



गुन्हेगारीचा कर्दनकाळ
क्राईम संध्या
सोमवार दि. २७ ऑक्टोबर २०२५ ते रविवार दि. २ नोव्हेंबर २०२५

शुभ दिपावली




वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व लहान मोठी अशा एकूण १६४ उद्याने स्वच्छता आणि देखभालसाठी शहरातील विविध महिला बचत गटांना मासिक मानधन तत्त्वावर दिलेली आहेत. आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांच्या संकल्पेतून, तसेच अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे व उपआयुक्त श्रीमती स्वाती देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळी सणानिमित्त या उद्यानांमध्ये महिला बचत गटांमार्फत उद्यान स्वच्छता करून रांगोळी काढण्यात आली तसेच पणत्या लावून सजावट करण्यात आली आहे. यामुळे या सजावटीमुळे उद्यानांना सौंदर्यपूर्ण असे वेगळेच स्वरूप आले आहे.

साप्ताहिक गुन्हेगारीचा कर्दनकाळ क्राईम संध्या

सर्व वाचकांना, जाहिरादारांना आणि शुभचिंतकांना दीपावली व नववर्षाच्या

लक्ष लक्ष शुभेच्छा!

ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय दवणहिप्परगा
ता.देवणी जि.लातूर
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
मा. सतीष पाटे – सरपंच
मा.माधव पाटील – उपसरपंच
मा. अविनाश पाटील – चेअरमन
मा.नागनाथ स्वामी – ग्रामविकास अधिकारी
शुभेच्छुक: अंकिता पाटील, संतोष सगर, आकाश पाटील,संजय कांबळे,सुधाकर कारभारी, अलका पाटील,रंजना इस्लामपूरे, लक्ष्मीबाई कांबळे, इंदूमती टिळे

प्रादेशिक परिवहन कार्यालय लातूर
शुभदिपावली
सर्व अधिकारी आणी कर्मचारी वृंद

सर्व जनतेला नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा
मा.काशिनाथ आण्णा गरिबे
माजी.तालूकाध्यक्ष भाजपा देवणी
माजी. अध्यक्ष संजय गांधी निराधार योजना समीती,देवणी

सर्व जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
मा. संतोष सोमवंशी
जिल्हाप्रमुख शिवसेना
महाराष्ट्र राज्य बाजार समीती उपसभापती

सर्व जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
मा. गोपीनाथ सगर
अध्यक्ष: संगायो ,इंगायो समीती देवणी
ता. देवणी जि. लातूर

नवी स्वप्ने नवी क्षितिजे, घेउन येवो ही दिवाळी,
ध्येयार्पण प्रयत्नांना, दिव्य यशाची मिळो झळाळी,
आयुष्यात सोनेरी क्षण घेऊन येवो,
ही दिवाळी.
शुभ दीपावली
सण दिवाळीचा,
आनंददायी क्षणांचा..
नात्यातील
आपुलकीचा,
उत्सव हा दिव्यांचा..
सर्वांना दिपावली निमित्त मंगलमय शुभेच्छा..!
भूमी फाऊंडेशन, औसा.
आंतराष्ट्रीय,पै.श्री.शिवशंकर हरिदास भावले
JUNIOR COMMISSION OFFICER, INDIAN ARMY
शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कृत (महाराष्ट्र राज्य).
एन.आय.एस.कुस्ती कोच, ASI Pune.
श्री.रविशंकर हरिदास भावले – अध्यक्ष, भूमी फाऊंडेशन
चि.गिरीशंकर हरिदास भावले – सचिव, भूमी फाऊंडेशन

विविध विकास कार्यकारी सेवा सोसायटी संस्था मर्यादित
दवणहिप्परगा ता. दैवणी जि. लातूर
सर्व जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
अविनाश बाबुराव पाटील – चेअरमन
दैवशाला दत्तू टिळे – व्हा.चेअरमन
रसूल शेख – गटसचिव
संचालक मंडळ
विजय जयवंत पाटील, संगशेट्टी गुणवंत कारभारी, दत्तू बाबुराव खिंडे, आनंदराव बिरादार, शिवकुमार बिरादार, संजीव सावळे,शेषराव सुर्यवंशी चंद्रकांत सिध्देश्वरे, आशा सतिष पाटे, सुधाकर चामे, नितीन तेलगावे,

सर्व जनतेला नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा
दिपज्योती डोळ्यांचा दवखाना
कॉम्प्युटर द्वारे नेत्र तपासणी
बीनाटाक्याची मोतीबींदूवर शस्त्रक्रिया
काचबिंदूचे निदान, उपचार, शस्त्रक्रियाची सोय
उदगीर शहरात प्रथमच आत्याधुनिक मशीनद्वारे शस्त्रक्रिया
मा. डॉ. ज्योती सोमवंशी
MBBS.,M.S.Ophthalm
मा. डॉ. दिपक सोमवंशी
नाईक चौक, निडेबन रोड,उदगीर जि. लातूर

सर्व जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
मा.अनिलजी मुदाळे
माजी न.प.सदस्य
नगर परीषद उदगीर जि. लातूर

सर्व जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
मा. रामलिंग शेषेराव शेरे
उप-सरपंच
भाजयुमो तालूकाध्यक्ष देवणी
समन्वयक अक्का फांऊडेशन निलंगा
ग्रामपंचायत धनेगांव ता. देवणी जि. लातूर

सर्व जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
मा. नागनाथ मलिले – ग्रामपंचायत अधिकारी
सौ.साधना विजय पाटील – सरपंच
ओमकार सखाराम बोडके – उपसरपंच
ग्रामपंचायत कार्यालय जवळगा ता. देवणी जि. लातूर

सर्व जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
मा. कृष्णाभाऊ वजनम – तालूका युवा अधिकारी,देवणी
मा. दिनेशदादा जावळे – युवासेना जिल्हाप्रमुख,लातूर

सर्व जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
शिवसेना
मा.धनराज बिरादार इंद्राळकर
तालूकाप्रमुख देवणी
शिवसेना शिंदे गट

सर्व जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
मा.अनिलजी मुदाळे
माजी न.प.सदस्य
नगर परीषद उदगीर जि. लातूर

दिपावली निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा
शुभ दिपावली
मा. मनोज शांतवीर कन्नाडे
प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी युवक काँग्रेस महाराष्ट्र राज्य
सचिव कै. वसंतराव काळे बहुउद्देशिय सेवाभावी संस्था,
पदाधिकारी राष्ट्रवादी शिक्षक संघ लातूर

दिपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा
इंजि. विनायक (अण्णा) बगदुरे
जिल्हा उपाध्यक्ष
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

सर्व जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
डॉ. शिवाजीराव सोनटक्के
उपप्राचार्य तथा ग्रंथपाल
कै. रसिका महाविद्यालय, ता. देवणी जि. लातूर

सर्व जनतेला दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
बावगे मेडिकल ॲण्ड जनरल स्टेअर्स
मा.सुनिल डिगंबरराव बावगे
बस स्थानका जवळ देवणी

दिपावली निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा
मा. बालाजी केंद्रे
मंडळ अधिकारी वलांडी
सर्व ग्राम महसूल अधिकारी ता. देवणी जि. लातूर

शुभदिपावली
मा. ज्योती बलांडे
शाखा अभियंता
बाधकाम विभाग न.प. देवणी